परमपिता परमात्मा त्रिमूर्ती शिवभगवानुवाच 'मन्मनाभव'।

# अमृत कुंभ

## अंतरंग

वर्ष २०, अंक १. एप्रिल – मे २०२६

### मुखपृष्ठाविषयी

विश्वचक्र हे अविरत फिरते मरणामधुनी जीवन उरते।
सारखा काळ चालला पुढे... या काव्यपंक्ती अगदी अचूक आहेत. सद्य:स्थितीत युद्धाचे वारे सर्वत्र वाहत आहेत. त्याचे अनेक दूरगामी परिणाम दिसून येत आहेत. कारखान्यांत कच्चा माल उपलब्ध होण्यात दिरंगाई, खनिज तेलाचे भाव वाढू पाहत आहेत, सर्वत्र अनिश्चिततेचे वातावरण पसरत आहे. हे सगळे कशाचे सूचक आहे? विश्वपरिवर्तनाची घटिका अति समीप आहे. बाह्य परिस्थितीवर आपले नियंत्रण येणे कठीण आहे; पण साधकाला आपल्या स्वस्थितीवर नियंत्रण ठेवणे जमू शकते. व्यर्थ, नकारात्मक विचारांत आपला वेळ फुकट न घालवता सत्कार्यात सफळ करणे हेच आपल्या हातात आहे.

आयुषः क्षणमेकोऽपि न लभ्यः कल्पकोटिभिः।
तस्मात् सर्वप्रयत्नेन क्षणमेकं न लङ्घयेत्।।

आयुष्यातला प्रत्येक क्षण अनेक सुवर्णमुद्रा किंवा अनमोल रत्ने देऊनही पुन्हा मिळवता येत नाही. शिवपित्याने दिलेल्या दिव्य ज्ञानानुसार हे युग म्हणजे 'पुरुषोत्तम संगमयुग' आहे. बुद्धिमान साधक आपला वेळ योग्य रीतीने वापरून परमेश्वराच्या आठवणीत व्यतीत करतो. त्याचे स्मरण सदोदित रहावे हाच संदेश मुखपृष्ठातून दिला आहे.

– प्रकाशिका




| | | |
|---|---|---|
| १. | संपादकीय...अजपाजप | २ |
| २. | श्रद्धांजली – भावसुमनांची | ४ |
| ३. | यज्ञेतिहासाची पाने पलटताना... | ७ |
| ४. | "खरी आध्यात्मिक सेवा" | ९ |
| ५. | एकटी तू गाणे गासी | १० |
| ६. | चंदन सान्निध्य | ११ |
| ७. | युवाशक्तीच्या कर्णधार : राजयोगिनी दादी रतनमोहिनीजी ! | १५ |
| ८. | परमात्म्याचा सत्य परिचय | २० |
| ९. | ज्ञानाची उकल दादी जानकीजींसोबत | २२ |
| १०. | स्वास्थ्य तुमच्या हातात | २७ |
| ११. | शिवावतरण (कविता) | २८ |
| १२. | सत्य (कविता) | २८ |



**फोटो, लेख इत्यादी पाठविण्याचा पत्ता :**
संपादक – अमृतकुंभ, द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज्
ए-१०, वर्षा अपार्टमेंट, छत्रपती शिवाजी सोसायटी,
कोपरी कॉलनी, ठाणे (पूर्व)-४००६०३
मोबाईल : ९८२००२३०९२ / ९८३३८२८६६१
E-mail : info@amrutkumbh.com

**वर्गणी पाठविण्याचा पत्ता :**
ब्र. कु. गोदावरी, प्रकाशक अमृतकुंभ
द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज्, ए-१०,
वर्षा अपार्टमेंट, छत्रपती शिवाजी सोसायटी,
कोपरी कॉलनी, ठाणे (पूर्व)-४००६०३
मोबाईल : ९८२००२३०९२ / ९८३३८२८६६१


Printed, published by B.K.Godavari on behalf of Prajapita Brahmakumaris Ishwariya Vishwa Vidyalaya. Printed at Perfect Prints, 22, Jyoti Industrial Estate, Nooribaba Dargah Road, Near Makhmali Talao, Thane (west), Pin 400601. Published at Prajapita Brahmakumaris Light House, Wagle Estate, Thane (west), Pin - 400604, Maharashtra. Editor : Mr. Sachin Vinayak Upadhye

वार्षिक वर्गणी रु. १००/-, एका अंकाचे रु. १६/-

E-magazine साठी पुढील संकेतस्थळाला (वेबसाईटला) भेट द्या – www.amrutkumbh.com

संपादकीय ... 

# अजपाजप



बहुतेक सर्व धर्मात किंवा पंथात कुठल्या ना कुठल्या प्रकारे नामस्मरण साधना सांगितली आहे. नामस्मरणासाठी जपमाळेचा आधार घ्यावा असेही सुचविले आहे. भारतीय संस्कृती किंवा हिंदू धर्मात १०८ मण्यांच्या माळेचे महत्त्व वर्णिले आहे. अनेक संतांनी 'जप साधना' कशी असावी यावर भाष्यही केलंय. याविषयावर आज सविस्तर विचार करूया.

त्याआधी एक स्पष्टीकरण मान्य करूया. 'धर्म' या शब्दाचे विविध अर्थ केले जातात. उदाहरणार्थ – धारणातद्धर्ममित्याहुर्धर्मोधारयते प्रजा: म्हणजे धारणा – (सद्गुणांची धारणा), धर्म म्हणजे – कर्तव्य – पितृधर्म, पुत्रधर्म इत्यादी. धर्म म्हणजे स्वभाव – अग्नीचा स्वभाव उष्ण, जळाचा शीतल अशा अर्थी. तर धर्म म्हणजे ईश्वर प्राप्ती किंवा मोक्षप्राप्तीसाठी करावयाची साधना. इथे धर्म याचा साधनेशी निगडित अर्थ अभिप्रेत आहे.

भारतीय अध्यात्म, योगशास्त्र आणि विविध धर्मपरंपरांमध्ये माळ किंवा जपमाळ याला अतिशय पवित्र स्थान आहे. रुद्राक्ष, तुळशी, चंदन, चांदी, अगदी लोकरीचा धागा यांच्या मण्यांनी केलेली माळ ही साधनेचे, जपध्यानाचे आणि अंतर्मन शुद्धीकरणाचे महत्त्वपूर्ण साधन मानली जाते. या सर्व माळांचे एक वैशिष्ट्य म्हणजे – त्यात असणारे १०८ मणी. हा १०८ हा अंक नेमका का पवित्र मानला जातो, यामागील शास्त्र, परंपरा आणि तत्त्वज्ञान समजून घेणे रोचक आहे.

**१. वैदिक परंपरेतील १०८ चे महत्त्व**

वैदिक ग्रंथांनुसार १०८ हा विश्वरचनेशी निगडित अंक आहे.

- सूर्य आणि पृथ्वीचे अंतर –
  सुमारे १०८ x सूर्याचा व्यास
- पृथ्वी आणि चंद्राचे अंतर –
  सुमारे १०८ x चंद्राचा व्यास

या नैसर्गिक गणनाकारणाने १०८ हा विश्वाशी एकात्म होण्याचे प्रतीक बनतो. म्हणून माळेतील १०८ मणी हा विश्वाशी जुळवून घेतलेला जप मानला जातो.

**२. योगशास्त्र आणि सूक्ष्मनाडी तत्त्व**

योगशास्त्रानुसार हृदयस्थ अनाहत चक्रातून १०८ नाड्या विश्वातील प्राणशक्तीकडे प्रवाहित होतात.

म्हणून १०८ वेळा जप केला की –

मन आणि चेतना एकसूरी लयीत स्थिर होते.

**३. १०८ चा तात्त्विक व अंकशास्त्रीय अर्थ**

भारतीय संख्याविचारानुसार –

- १ → एकत्व, परमेश्वर, अद्वैत तत्त्व
- ० → शून्यता, पूर्णत्व
- ८ → अनंत (∞), अविनाशीपण म्हणून १०८ म्हणजे शून्यापासून अनंतापर्यंत जाणारा आध्यात्मिक प्रवास

**४. धर्मशास्त्रातील १०८ चा संदर्भ**

- १०८ महत्त्वाची उपनिषदे मानली गेली आहेत.
- १०८ देव–देवतांच्या संकल्पना स्वीकारल्या गेल्या आहेत.
- २७ नक्षत्रे x ४ मुख्य दिशा = १०८ म्हणून १०८ हा पूर्णत्वाचा, व्यापकतेचा आणि सांस्कृतिक एकतेचा अंक आहे.

◆ **विविध धर्मांतील जपमाळ**

➢ **हिंदू धर्म किंवा भारतीय परंपरा / संस्कृती**

रुद्राक्ष, तुळशी, चंदन, स्फटिक यांच्या माळा प्रामुख्याने १०८ मण्यांच्या असतात. जप, गायत्री मंत्र, शिवजप किंवा वैष्णव संप्रदायातील नामस्मरणासाठी यांचा उपयोग करतात.

➢ **बौद्ध धर्म**

तिबेटमध्ये जपमाळेला 'थेंगबा' म्हणतात.

बौद्ध मतानुसार १०८ क्लेश (मानसिक अपवित्रता) जिंकण्याने मन शुद्ध होते असे बौद्ध तत्त्वज्ञान मानते, महत्त्वाच्या १०८ प्रकारच्या भौतिक कामना असतात. या सगळ्यावर विजय

मिळवण्यासाठी १०८ मण्यांची माळ जप साधनेसाठी वापरावी. जपासाठी मूळ संख्या १०० जप + ८ चूकभूल दुरुस्ती म्हणून १०८ हा आकडा वापरला जातो.

➢ **जैन धर्म**

जैन परंपरेतही ध्यान, नवकार मंत्र आणि तीर्थंकरांच्या स्तुतीसाठी १०८ मण्यांच्या माळा वापरल्या जातात.

➢ **शीख धर्म** (शीख हा धर्म आहे तर काहींच्या मते तो पंथ आहे; पण या वादात पडण्याचे इथे काहीच कारण नाही).

शीख, माळेला सिमरनी / स्मरणी म्हणतात. नामस्मरण (वाहेगुरू जप) करण्यासाठी माळेचा उपयोग होतो. जपसाहीब किंवा जपुजी साहिब असे सकाळी म्हणावयाच्या पाठाचे नावही आहे. जसे वारकरी संप्रदायात हरिपाठाच्या अभंगांचे महत्त्व आहे. 'शेर-ए-पंजाब रणजितसिंह' यांनी फकिर 'अजीजुद्दिन' यांना विचारले - 'मणी सारायचे की ओढायचे?'

त्यावर फकिरांचे सुंदर उत्तर आले -''अवगुण सार, सद्‌गुण ओढ (म्हणजे स्वतःमध्ये धारण कर).''

➢ **इस्लाम धर्म**

इस्लाममध्ये अल्लाहची १०० नावे प्रसिद्ध आहेत. लोकपरंपरेनुसार त्यांपैकी ९९ नावे पैगंबरांना प्रकट झाली, आणि १०० वे नाव त्यांच्या नेहमीच्या उंटाच्या (की उंटिणीच्या ?) कानात सांगितले असेही म्हटले जाते. जपमाळेला तस्बीह, मिस्बाहः अशी नावेही आहेत. काहीजण ३३ मण्यांची माळ तीन वेळा फिरवून ९९ चा आकडा / जप करतात. काही ९९ मण्यांची माळ वापरतात.

➢ **ख्रिस्ती धर्म (रोमन कॅथोलिक चर्च)**

ख्रिश्चन परंपरेतील जपमाळेला 'रोजरी' म्हणतात.

- नियमित रोजरी - ५९ मणी
- प्राचीन लांब रोजरी - १५० मणी

'Rosarium' म्हणजे गुलाबांची बाग; 'Beads' म्हणजे प्रार्थना जपातील मणी. ज्याच्या-त्याच्या श्रद्धेनुसार माळ वापरली जाते.

♦ **माळेचे खरे तत्त्वज्ञान : अंतरंगातील माळ**

संतमंडळी स्पष्ट म्हणतात -

'' हातातली माळ ओढता ओढता जग गेले, पण मनाचे मणी फिरले नाहीत तर जप निष्फळ!'' कबीर म्हणत, **''माला जपकर जग मुआ, गया न मन का फेरा हाथ का मणका दारि के मन का मणका फेर''**

साधकांनी कर्मकांडात न अडकता मनाची एकाग्रता मिळवणे हाच खराखुरा जप होय. जपमाळ घेऊनही जर अंगी तमोगुण असेल तर काय होते त्याचे दर्शन समर्थ रामदासांच्या दासबोधात होते.

**''हाती द्रव्याची जपमाळ । कांताध्यान सर्वकाळ । सत्संगाचा दुष्काळ । या नांव बद्ध ।।''**

म्हणजे संतानाही ज्ञात होते- माळ हातात असूनही मन भरकटू शकते.

इतर अनेक साधनांच्या वापरातही मन भरकटू शकते. उदाहरणार्थ -आरती म्हणताना मन वेगळा विचार करतं आणि तोंडाने आरतीही चालू असते असाही अनुभव येतो. यावर उपाय म्हणून शिवपित्याने दिलेले ज्ञान प्रत्यक्षात आणता येते. शिवपिता म्हणतात, तुम्ही सर्व मर्त्य मानव एक ज्योतिर्बिन्दु आत्मा आहात. देहममता सोडा आणि आत्मनिश्चय करा. भृकुटीच्या मध्यभागी मन-बुद्धी एकाग्र करा आणि देहभान सोडायचा अभ्यास करा. त्यानंतरची साधनेची पायरी म्हणजे निराकार शिवावर ध्यान केंद्रित करा. अशा प्रकारे साधना करून विशेषरूपाने पारंगत होणारे १०८ साधक अंतिम काळी प्रसिद्ध होतात. अशा मंडळींचे वर्णन भक्तीमार्गात माळेच्या रूपात होते. असे साधक म्हणजे जणू माळेतील मणी आणि त्यांच्या हृदयस्थ असणारे ईशप्रेम म्हणजे जणू सूत्र (मण्यांना बांधणारा धागा) हाच खरा आध्यात्मिक अर्थ शोभतो. मात्र याकरिता तितकी घनघोर साधनेची कास सुटता कामा नये. हीच राजयोगाची साधना आहे. राजयोग साधनेची सर्वोच्च स्थिती आहे- कर्म करतानाही निरंतर शिवपित्याची मधुर स्मृती रहावी आणि त्यात देहभानही गळून पडावे मात्र कर्मकुशलतेचाही अनुभव व्हावा. याविषयी पूर्वी होऊन गेलेल्या साधकांनी अशा अवस्थेचे वर्णन खालीलप्रमाणे केले आहे. जपसंख्या मोजायची नसते. जप करताना मोजण्याचे भानही न राहणे यालाच म्हणतातः **''तस्बीह बहाई पानी में''** - जपात पूर्ण विलीन होणे. जप आणि अ-जप (म्हणजे जप सुटणे किंवा स्मरणाचे विस्मरणात रूपांतर होणे) यातील अंतर नष्ट होणे अर्थात सदा सर्वकाळ जप चालू राहणे. राजयोगात ह्यालाच निरंतर स्मृतीत रममाण होणे असे म्हटले आहे.

या सगळ्याचा विस्तार समजून आपल्या जीवनात आणायचा असेल तर ब्रह्माकुमारीजच्या शाखेत जाऊन अधिक माहिती घेऊ शकता. राजयोगाविषयी मोफत समजून घ्या.

***



# श्रद्धांजली - भावसुमनांची

ब्र.कु. गीता दीदी, शांतिवन, आबू रोड

मार्च महिन्यात ब्र.कु. गीता दीदींनी देह ठेवला. त्यांच्या स्मृतीस अभिवादन करून हा लेख देत आहोत. गीता दीदींच्या शब्दातील हा अनुभव आहे.

राजयोगिनी आदरणीय गीता दीदींचा जन्म १९५५ साली, गुजरात राज्याच्या आणंद जिल्ह्यात, एका प्रतिष्ठित सुशिक्षित परिवारात झाला. लहानपणापासूनच त्यांना अभ्यासाची विशेष आवड होती. त्या नेहमीच गांधीजी आणि विवेकानंदांच्या आयुष्यातून प्रेरणा घ्यायच्या. सरळ स्वभाव, गंभीर विचारांची बैठक आणि दृढ नेतृत्व कला अशी काही ठळक वैशिट्ये त्यांच्या व्यक्तिमत्त्वात होती.

१९६९ मध्ये, अवघ्या १४ व्या वर्षी त्यांना माऊंट आबूच्या म्युजियमद्वारे ईश्वरी ज्ञानप्राप्ती झाली. १९७० मध्ये, पहिल्यांदाच अव्यक्त बापदादांना भेटण्याची संधी मिळाली आणि पुढे १९७२ साली त्यांनी आपले जीवन ईश्वरी सेवेमध्ये समर्पित केले.

तेव्हापासून त्यांनी सुरत, भरूच, अहमदाबाद, वडोदरा, भावनगर ह्या ठिकाणी सेवा केली. १९९५ ते २०१० पर्यंत त्यांनी माऊंट आबू येथील ज्ञानसरोवर म्हणजेच 'Academy for a better world' इथे अंतर्गत प्रशासिका म्हणून विशेष कार्यभाग सांभाळला. २०११ पासूनच शांतिवन येथे मुख्य राजयोग शिक्षिका म्हणून त्या सेवारत होत्या. त्या एक उत्कृष्ट वक्ता व प्रशासिका होत्या. ह्या व्यतिरिक्त, १९९६ पासून दीदी 'Business and industry wing' च्या headquarter coordinator म्हणून सेवा करत होत्या.

गीता दीदींनी अमेरिका, कॅनडा, इंग्लंड, बांगलादेश अशा अनेक देशात ईश्वरी ज्ञानाचा प्रचार व प्रसार केला. आपल्या अंतिम क्षणापर्यंत, त्यांनी आपल्या आदर्श जीवनशैलीने अनेकांना श्रेष्ठ जीवन जगण्याची व तणावमुक्त राहण्याची कला शिकवत राहिल्या.-

आपल्या अलौकिक जीवनाचे वर्णन करताना गीता दीदी म्हणतात, आमचे कुटुंब गुजरातमध्ये सुरत जवळील बारडोली तालुक्यात वास्तव्यास होते. माझे लौकिक वडील तिथे तालुका डेव्हलपमेंट ऑफिसर म्हणून कार्यरत होते. पूर्वाश्रमीच्या संस्कारांमुळे मला लहानपणापासूनच आंतरिक वैराग्याची अनुभूती होत असे. मी ८व्या इयत्तेत शिकत होते तेव्हापासूनच मला हे विचार येत असत ह्या जीवनाचे अंतिम ध्येय काय आहे? मला कशासाठी जगायचे आहे? आजूबाजूच्या लोकांचे आयुष्य हे शिक्षण, नोकरी, लग्न संस्कार, संतती पालन ह्या मधेच व्यग्र असलेले पाहून मी विचार करायचे ह्याच्यासाठीच मनुष्य जन्म मिळाला आहे का? ध्येयनिष्ठ जीवन जगण्याचा दुसरा काही मार्ग असेल का?

बालपणीपासूनच चिंतनात्मक साहित्य वाचण्याची मला भारी आवड होती. गांधीजी, विनोबा भावे, विवेकानंद, अरविंद घोष अशा महात्म्यांनी लिहिलेले जे वैचारिक लेख छापून येत ते मी वाचत असे. अत्यंत साधेपणाचे आयुष्य मी जगले. फॅशन करणे, छानशौकीत आयुष्य घालवणे किंवा मित्र-मैत्रिणींबरोबर बाहेर फिरणे ह्या सगळ्याला त्यात स्थान नव्हते. मला लिहिण्या-वाचण्याची कमालीची आवड होती.

मी ८ वी इयत्ता उत्तीर्ण झाले आणि १९६९ मध्ये मे महिन्याच्या सुट्टीमध्ये आम्ही माऊंट आबू येथे फिरायला गेलो होतो. तेथील सनसेट रोडवर ब्रह्माकुमारीजचे म्युझियम आहे ते पाहण्यास आम्ही गेलो होतो. तेथील गाईड्स एक एक ग्रुपला समजवत पुढे जात होते. खूप गर्दी होती आणि माझे वयही लहान असल्याने इतके काही समजले नाही. मात्र माझ्या वडिलांना त्या ज्ञानाबद्दल फारच उत्सुकता निर्माण झाली. आणि तिथे विक्रीसाठी असलेल्या विविध हिंदी पुस्तके त्यांनी

विकत घेतली आणि आम्ही घरी परतलो.

त्या नंतर वडिलांना ज्ञानाची इतकी ओढ लागली. त्यांनी घरामध्येच पाठशाळा सुरु केली. त्या काळात, केवळ वडोदरा सोडले तर, सुरत पासून मुंबई पर्यंत एकही सेवाकेंद्र नव्हते. माझे वडील त्या पुस्तकातील एक पाठ रोज आम्हाला वाचून दाखवत. आम्ही कोणीच राजयोगाचा कोर्सही केला नव्हता आणि आम्हाला राजयोग कसा करतात काहीच माहीत नव्हते. माझ्या वडिलांच्या विभागातच एक हेल्थ सेन्टर होते, तिथे काम करणाऱ्या वडोदऱ्याच्या डॉ. जयंत भाईंशी, कालांतराने वडिलांची ओळख झाली. आणि त्यांच्या घरात असलेली ज्ञानमार्गातील चित्रे, पुस्तके वडिलांच्या दृष्टीस पडली तेव्हा त्यांना खूप आनंद झाला. त्यांनी चौकशी केली चित्रे कुठे मिळतील याबाबत. जयंत भाईंची साकार ब्रह्माबाबांशी भेट घडली होती. त्यांच्या मार्फतच हे ज्ञान मिळाले त्यांना. मग माझ्या वडिलांनी रोज बार्डोलीपासून त्या हेल्थ सेन्टर पर्यंत प्रवास सुरु केला. तिथे ते राजयोग कोर्स करायचे आणि घरी येऊन तेच पाठ आम्हा सर्वांना द्यायचे. अशा प्रकारे ज्ञान गंगेचा उगम आमच्या घरी झाला.

जयंत भाई ह्यांची पत्नी चंपा बहन एका हेल्थ सेन्टरवर काम करत. त्यांची सहकारी नर्स, हंसाबहनने देखील ज्ञान ऐकले आणि त्याही या मार्गात रुळल्या. अशा प्रकारे माझे आई–वडील, जयंत भाई आणि चंपाबेन व हंसाबेन ह्या ५ जणांची टीम बनली आणि आमच्या वडिलांना सत्य ज्ञान सर्वांना द्यायचा ध्यासच लागला.

त्यावेळी मला मॅट्रिक परीक्षेची सुट्टी लागली होती. आणि वेळेचा सदुपयोग करत मी १९६५ ते १९७२ च्या दरम्यान प्रकाशित झालेले 'ज्ञानामृत' ह्या मासिकाचे सर्व अंक वाचले. आणि त्या सगळ्या अवांतर वाचनाने माझ्या बुद्धीत ज्ञानाची स्पष्टता अशी काही झळकली. माझा ठाम निश्चय झाला ज्याच्या शोधात मी होते ते हेच तर सत्य ज्ञान आहे.

**निःस्पृहस्य तृणं जगत्** या न्यायानुसार मला सांसारिक जीवन पसंत नव्हते. घराच्या चार भिंतीतून बाहेर पडून काहीतरी विलक्षण काम करायचे होते; पण ते कार्य काय आहे हे स्पष्ट होत नव्हते.ती स्पष्टता मला ज्ञानामृत मासिकाच्या अध्ययनातून मिळाली. माझा अंतिम निर्णय झाला. ईश्वरी सेवेत स्वतःला वाहून घ्यायचे ठरले. मॅट्रिक परीक्षेनंतर, निकालाची वाटही न बघता, मी घरातून निघाले व सुरत सेवा केंद्रावर वास्तव्य करू लागले. नंतर निकाल लागल्यावर कळले दक्षिण गुजरात विभागात मी पहिला क्रमांक पटकाविला आहे. पण माझा तर निर्णय झाला होता. लौकिक अर्थाने कुठलेही मोठे यश मला आकर्षित करत नव्हते. आयुष्याची दिशा ठरली होती.

वडिलांची सरकारी नोकरी आणि सेवानिष्ठ वृत्ती यामुळे त्यांनी ज्ञानामृत मासिकाचे २१०० सभासद बनवले. त्यामुळे पूर्ण यज्ञ परिवारात त्याबद्दल मोठी चर्चाच घडायला लागली. ते आणि आम्ही सगळे प्रसिद्ध होत गेलो. ह्या पार्श्वभूमीवर जेव्हा १९७० मध्ये पहिल्यांदा मी बाबा मिलनासाठी मधुबनला गेले तर सर्व दादी माझी वाट पाहत होत्या. वडोदरा सेवाकेंद्राच्या प्रमुख, छुग्गी दादीजी, त्यांचे लौकिक नाव आत्मचंद्रा होते, त्या आम्हाला माऊंट आबूला घेऊन गेल्या. मधुबनच्या अंगणात सर्व दादी उपस्थित होत्या. त्यांनी खूप प्रेमाने आमची भेट घेतली, स्वागत केले. ह्या कल्पात पहिल्यांदाच मी बापदादांना भेटले आणि तो एक विलक्षण अनुभव होता. ह्यापूर्वी भक्ती मार्गात किंवा इतरही साधू संतांना भेटण्याचा असा काही अनुभव गाठीशी नव्हता. जेव्हा मी बाबांच्या समोर बसले आणि अव्यक्त बापदादांशी माझे मिलन झाले, तेव्हा त्यांच्या आत्मिक दृष्टी आणि प्रेमात मी वाहत गेले. माझ्या बुद्धीत दुसरा कुठलाच संकल्प येत नव्हता. मी बाबांकडे एकटक बघत राहिले आणि प्रियतम बाबांनी मला विचारले, बाळ तू कुठल्या परिवाराची आहेस? तर माझे स्वाभाविक उत्तर होते, बाबा मी तर ह्याच ईश्वरी परिवाराची आहे! तेव्हा बाबांनी महावाक्य उच्चारली ही मुलगी ईश्वरी परिवारात समर्पित होणारी सेवाधारी आहे. मग माझ्या निर्णयावर तर शिक्का मोर्तबच झाले. गगनच ठेंगणे झाले माझ्यासाठी. दुसरे कुठलेच विचार माझ्या मनात आले नाहीत आणि बाबांनी जे सांगितले त्याला मी लगेच स्वीकृती देऊन टाकली. आजूबाजूला जवळपास १५०– २०० भाऊ बहिणी होते. पण जणू काही मी मंत्रमुग्ध होऊन, मनाने वेगळ्याच दुनियेत वावरत होते. जेव्हा मी दादींना भेटले, तेव्हा त्यांनी मला विचारले खरंच तू हे समर्पित जीवन जगू शकशील का? मी नक्कीच बघेन कुठपर्यंत माठातले पाणी गार राहते ते. दादींच्या ह्या उद्गारांनी माझ्या मनावर छाप उमटवली आणि मी मनाशी पक्के ठरवले मला ह्या ईश्वरी सेवेत असे जीवन बनवायचे आहे जेणेकरून मी संपूर्णपणे

प्रेमाने, शांतीने व एकाग्रतेने चालत राहीन. झालेही तसेच, बाबा, बाबांचे ज्ञान आणि सेवा, ईश्वरी कुटुंब हेच माझे उद्धिष्ट बनले.

माझी सुरुवात सुरत सेवाकेंद्रावर सेवा करण्याने झाली. तेथील आदरणीय लता दीदीजी खूपच अथक सेवाधारी असल्याने लागोपाठ एका नंतर एक सेवेचे कार्यक्रम होत राहिले. सुरत नंतर मग राजपिपला, भरूचमध्ये सेवाकेंद्र चालू झाले आणि दीदींनी मला भरूच सेवाकेंद्रावर सेवेसाठी पाठवले. अंदाजे १.५ वर्ष सुरतला राहून मग पुढले १.५ वर्ष मी भरूच सेवाकेंद्रावर राहिले. आणि तेथूनच ग्रुप घेऊन मी मधुबनला गेले होते. आणि त्याकाळी जेव्हा आम्ही मधुबनला पोहोचायचो तेव्हा आधी आम्ही तडक दादींना भेटायला जायचो. मी जेव्हा दादींना भेटायला गेले तेव्हा गुजरातचे एक मुख्य हसमुख भाई, तेथे बसलेले होते. दादी त्यांना म्हणाल्या, घ्या हसमुख भाई, हा तुमचा हॅन्ड आला. कारण त्यावेळी मी गुजराती भाषेतून खूप छान छान लेख लिहायचे, ते वर्तमानपत्रात प्रसिद्ध व्हायचे. माझे गुजराती भाषेवरचे प्रभुत्व छान होते. आणि त्यावेळी अहमदाबादमध्ये गुजरात झोनचे मुख्यालय होते. गुजराती ज्ञानामृत मासिकाचे वितरण सुरु झाले होते. गुजराती भाषेवर प्रभुत्व असलेल्या, एखाद्या बहिणीची आवश्यकता होती. म्हणूनच दादींनी माझं नाव सुचवलं. दादीजींची आज्ञा शिरसावंद्य मानून मी अहमदाबादला गेले.

अशा प्रकारे मी ३ वर्ष सरला दीदींच्या सान्निध्यात राहून अहमदाबाद येथे सर्व प्रकारची सेवा केली. ह्या ३ वर्षात मला मोठ्या मोठ्या सभांना, संमेलनामध्ये जाण्याचा आणि मोठे आध्यात्मिक मेळावे भरवण्याचा व तेथे योग शिबीर करवून घेण्याचा अनुभव मिळाला. अशा प्रकारे ही ३ वर्ष माझ्या आयुष्यात अत्यंत प्रगतीची होती. संपूर्ण भारताच्या प्रत्येक राज्यात जाऊन शिबीर करवण्याची संधी मिळाली.

अशा प्रकारे २१-२२ वर्ष गुजरातमध्ये सेवा केल्यानंतर सन १९९३ च्या डिसेंबरमध्ये माझे मधुबनला जाणे झाले. नुकतीच ज्ञानसरोवराच्या बांधकामाला सुरुवात झाली होती. १ वर्ष मी पांडव भवन येथे राहिले. आणि तेथे भरणारे राजयोग शिबीर, बाबा मिलनाचे कार्यक्रम, आयोजित होणाऱ्या भट्टी ह्या सर्वांमध्ये मनोहर दादी, शीलू बहन, शशी बहन ह्यांच्या समवेत सेवा करण्याचा माझा योग आला.दादीजी, मोहिनी बहन, मुन्नी बहन ह्यांच्याशी पण मी संपर्कात होतेच. आणि मग सन १९९५ मध्ये जेव्हा ज्ञानसरोवरचे उदघाटन व्हायचे होते, तेव्हा दादीने मला सांगितले आता तू ज्ञानसरोवर मध्ये राहून तिथला सेवाभार सांभाळ. अशा प्रकारे मी जानेवारी १९९५ मध्ये ज्ञानसरोवरामध्ये वास्तव्यास गेले आणि एकंदर १६ वर्षे मी ज्ञानसरोवराची सेवा सांभाळली.

सर्व दादी आणि वरिष्ठ बहिणींच्या सहवासात साधे जीवन आणि उच्च विचारसरणीच्या छायेत प्रत्येक परिस्थितीमध्ये आणि प्रत्येक पावलावर माझी प्रगतीच झाली. मुरलीचे अध्ययन, ज्ञानाचे मनन चिंतन हे माझे सर्वात प्रिय विषय होते. झोनल स्तरावरही माझ्या हातून सेवा घडू शकली.

माझ्या आयुष्याची मुख्य धारणा मुरलीचे अध्ययन हेच आहे. मुरली वाचन, ऐकणे, लिहिणे ह्यामुळे त्यातले गुह्य ज्ञान आणि मुख्य ज्ञान बिंदू माझ्या लक्षात राहू शकले. ह्या योगेच आयुष्यात येणाऱ्या परिस्थिती रुपी परीक्षा मी सहजरित्या उत्तीर्ण करत गेले. ह्या ज्ञानधनामुळे येणाऱ्या परिस्थितीने मी कधी बावचळले नाही किंवा निराशही झाले नाही. ज्ञानमुरली द्वारे स्वतः बाबा मला मार्गदर्शन करत आहेत हीच भावना असल्याने मी स्वतःची स्वतः सारथी बनले आणि बाबाशी योगयुक्त राहून जीवनाचा रथ हाकत राहिले.

स्वानुभवावरून मी सांगू शकते जर रोजची दिनचर्या आपली काटेकोरपणे पाळली तर आपली स्थिती बनत जाते. जर ह्या विद्यालयात राहून येथील नियमांचे पालन केले नाही तर काय फायदा? कुठल्याही समारंभात पुढे पुढे न करणे, हे मला मनापासून पसंत असल्याने मी खूप आनंदाने मान-मरातबाचा त्यागही करू शकले. आपण त्याग करू तितकेच आपण वरिष्ठांच्या मनात घर करू. दादी आम्हाला पुढे जाण्याचे प्रोत्साहन देत राहिल्या आणि प्रिय बाबांनी पुढे जाण्याचे सर्व मार्ग खुले केले. अशा प्रकारे मला आयुष्यात कुठलीच गोष्ट हरवली आहे असा भास कधीच झाला नाही.

अशा प्रकारे समर्पित जीवनाच्या ५० व्या वर्षात मी पोचले आहे. शांतीवनमध्ये आणि इतर विशाल सेवेत मी कार्यमग्न आहे. ह्याच बरोबर माझे हेच ध्येय आहे, की बाबांची जी इच्छा आहे तसेच करून दाखवायचे. जे बाबा सांगतात ते करत राहायचे. सुरवातीपासूनच माझ्या मध्ये असलेले

(पृष्ठ क्र.१९ वर)



# यज्ञेतिहासाची पाने पलटताना...
## "मुरलीचे महत्त्व"

**दिवंगत दादी गुलजार**

आम्हा लोकांचा अनुभव सांगायचा झाल्यास - आम्ही जेव्हा सेवा करण्यासाठी बाहेर पडलो, तेव्हा इतरांप्रमाणे आम्ही बहिणीही बाबांकडे ग्रुप घेऊन यायचो. बाबांवर असलेल्या अती प्रेमामुळे आम्ही सर्वजण तयार होऊन घाईघाईत बाबांकडे जायचो, त्यांना भेटायला.

गेल्या-गेल्या बाबांचा पहिला प्रश्न हाच असायचा, 'ज्ञान मुरली वाचलीत का?' आम्ही म्हणायचो बाबा अहो आम्ही आताच ट्रेनचा प्रवास करून आलोय. लगेच तयार होऊन तुमच्याकडे आलो. बाबा पुन्हा म्हणायचे, 'मुरली वाचा हं, विसरू नका', मुरली अभ्यासाल तरच बाबांच्या लेखी, तुमचे शिवबाबांवर प्रेम आहे. बाकी भेटायला आलात वगैरे ठीक आहे. भेटणे म्हणजे प्रेम आहे असे नव्हे, खरे प्रेम मुरली वाचाल तेव्हाच.'

बाबांचे मुरलीवर एवढे प्रेम होते. आम्ही हेही बघितले की ब्रह्मा बाबांनी मुरली कधीच चुकवली नाही. ते शस्त्रक्रियेसाठी मुंबईला देखील गेले. पण आम्हा मुलांसाठी बाबा मुरली लिहून पाठवायचे आणि मग मम्मा ती मुरली वाचून त्यावर मंथन (क्लास) करायची.

१८ जानेवारी बाबांचा शेवटचा दिवस घ्या. बाबांची तब्येत थोडीशी नरम गरमच होती. त्यामुळे ते सकाळचा क्लास करू शकले नाहीत. पण (ब्रह्मा) बाबा संध्याकाळी आले, मुरली चालवली शेवटच्या मुरलीचे ते शेवटचे शब्द निराकारी भव निर्विकारी भव, निरहंकारी भव तुम्हालाही आठवत असतीलच. सांगायचं तात्पर्य काय, तर शेवटच्या दिवसापर्यंत एकही दिवस मुरली विना गेला नाही.

काही मुले असे म्हणायची, 'बाबा, तुमच्यावर आमचे फार प्रेम आहे. तुम्ही आम्हाला फार गोड वाटता. खूप आवडता' बाबा म्हणायचे हे पाहा ही माझी भक्त मंडळी. ह्यांना बाबांच्या मुरलीशी काही घेणे देणे नाही. पण बाबांचे प्रेम कशावर आहे - तर मुरलीवर. जर तुमचे बाबांवर प्रेम असेल. तर नक्कीच मुरलीवरही तेवढेच प्रेम असायला हवे.' बाबांना ते पटायचेच नाही. बहिणी कितीही पटवून द्यायचा प्रयत्न करत की बाबा आमचे खरंच तुमच्यावर प्रेम आहे. असं कसं तुम्ही म्हणता की नाही' पण तरी बाबा म्हणायचे, नाही, मला हे पटणारच नाही, ज्याच्यावर आपले प्रेम असते, त्या व्यक्तीला जी गोष्ट आवडते, प्रिय असते, ती गोष्ट आपल्यालाही प्रिय असायलाच हवी ना?'

तर आपण प्रत्येकानीच हे तपासावे' एवढे आमचे मुरलीवर प्रेम आहे का? रोज-रोज मुरली तेवढ्याच तन्मयतेने आपण वाचतो का? समजा अशी काही परिस्थिती आली की ज्यामुळे सेवाकेन्द्रात जाणे शक्य नाही झाले, तर अशावेळी तुम्ही घरात तर मुरली वाचू शकता नं ! मला हे पटतच नाही की मुरलीसाठी वेळ नाही. जर तुम्ही कार्यालयात जायला ८ वाजता निघत असाल, तर मुरलीसाठी तुम्ही जरा आधी म्हणजे ७.४५ ला निघा, सेवाकेन्द्रात, बाबांच्या रूममध्ये जा आपली हजेरी तर लावा. वेळच नसेल तर निदान वरदान तरी ऐका - मुरलीसाठी फार वेळ नाही लागत अगदी १०-१५ मिनिटेही पुरतात.

समजा एवढाही वेळ नाही, (तसे हे मला मान्य नाही की कुणाकडे इतका कमी वेळही नाही मुरलीसाठी) कारण प्रत्येकाची परिस्थिती वेगळी असते. पण आजकाल हे जे मोबाईल (भ्रमणध्वनी) फोन आलेत न, त्यावर चालता-फिरता मुरली ऐकू शकता.

माझा अनुभव आहे हा. आम्ही एकदा कॅनडाला गेलो असता तिथे पोलिसातला एक मोठा अधिकारी भेटला. तो म्हणाला, "माझे मुरलीवर फार प्रेम आहे, मला मुरली फार फार आवडते पण मी सेवाकेंद्रावर मुरलीसाठी जाऊ शकत नाही. तुम्ही माझ्या कार्यालयात येऊन बघा, मला

किती कामे असतात ते !'' मी म्हटले, ''हो मी नक्की येऊन बघेन' मी तिथे पोचले (तुम्हालाही अनुभव असेल) बापरे किती-किती फोनवर फोन - जागोजागी टेबला-टेबलावर फोन. मी त्याला म्हटले, ''अस बघ, मला एक गोष्ट तरी येते. तुमच्या टेबलांवर किती ठिकाणी फोन लागलेले आहेत. तुम्ही ह्या फोनमध्ये फक्त निदान वरदान तरी ऐकू नाही शकत का?'' तो जरा वरमला, म्हणाला, ''हो दादी हे तर मी नक्कीच करू शकतो.''

आजकाल तर प्रत्येकाच्या हाती मोबाईल आलाय. इथे एका खोलीतून दुसऱ्या खोलीत जायला निघाले असता, फोनवर त्या मधल्या काळात वरदान ऐकू नाही शकत! जर मनापासून ओढ असेल तर हे शक्य होणार नाही का! मुरली ऐकणे म्हणजे बाबांकडे आपली हजेरी लावणे होय. युनिवर्सिटी-कॉलेज-शाळा ह्यांत हजेरी असते की नाही? हजेरी पूर्ण असेल, तरच परीक्षा देता येते ना? म्हणूनच सेवाकेंद्र ही शाळा, कॉलेज, युनिवर्सिटी आहे. त्यात हजेरी लावणे गरजेचे आहे. विचार करा जरा - बाबा किती लांबून येऊन मुरली ऐकवतात.

परमधामातून - माझ्यासाठी बाबा येतात. जसे आपण म्हणतो न, 'मेरा बाबा' 'माझा बाबा' असा माझा बाबा, माझा शिक्षकही आहे नं! माझा सत्‌गुरूही आहे 'मेरा बाबा' म्हणतात. त्याच हक्काने आपण म्हणावे. माझ्यासाठी लांबून माझे शिक्षक येतात. मला शिकवायला 'तो' जर परमधामातून रोजच्या रोज येऊ शकतो, तर आम्ही इथल्या इथे गल्ली बोळातून सेवाकेंद्रावर मुरलीसाठी जाऊ शकत नाही का?

मला तर फार नवल वाटते. कशाही पद्धतीने मुरली वाचावीच. चला मान्य करते, की चार पानांची मुरली आठवणीत राहत नाही वरदान तर लक्षात राहील, वरदानालाही वेळ नसेल समजा वरदानानंतर अर्ध्या ओळींचे एक Slogan असते. ते तरी लक्षात ठेवावे. अर्धी ओळही ऐकायला वेळ नसावा ! कमाल आहे. असे तर कुणी करत असेल असे मला वाटत नाही.

संपूर्ण दिवसासाठी आपल्या मनाला एक काम द्यावे. बघा आपल्या मनात व्यर्थ विचार फार चालतात. एका सेकंदात तुम्ही व्हिसा, पासपोर्टशिवाय, तिकिटाशिवाय अमेरिकेत पोहचू शकता केवळ संकल्पांनी. तर मनातले व्यर्थ विचार कंट्रोल करण्यासाठी त्याच्याजागी चांगले सकारात्मक (Best) विचार करावेत. बेस्ट द्वारे वेस्ट संपवावेत. जसे प्रकाश अंधाराला संपवून टाकतो. म्हणूनच सकारात्मक विचारांचा साठा जर वाढवला तर व्यर्थ आणि नकारात्मक विचार सहज संपू शकतील नाही का ! ह्यात आपलाच फायदा आहे. बाबांचा नाही. आणि मुरली वाचल्याने परमेश्वराकडे थेट आपली हजेरी लागेल. शिक्षकाकडे हजेरी लागणे. ह्याचेही वेगळे गुण मिळतात बरं का!

म्हणूनच मी म्हणते मुरली कधीच बुडवू नका. कराचीमध्ये आम्ही सर्व लहान मुलं बाबांजवळ राहत होतो. बाबा म्हणायचे, चला आजारी आहात, उठूही शकत नाहीत, तरी बिछान्यावर पडल्या-पडल्याही मुरली ऐका. मुरली बुडवू नका मुलांनो.' बाबांना ते मुळीच आवडायचे नाही. बाबांची मुरलीसाठी कळकळ होती आणि आपण जर म्हटले, ''बाबा, प्रेम तर आमचे तुमच्यावर १००% पेक्षाही जास्त आहे' बाबा हात वर करायला सांगतात. तेव्हा सगळेच हात वर करतात की हो बाबा तुमच्यावर आमचे खरेच प्रेम आहे. बाबा विचारतात 'किती प्रेम' तर म्हणतात, 'बाबा तुम्ही म्हणाल तेवढे आमचे प्रेम आहे' तर मग मला सांगा प्रेमाची खूण काय बरे असेल? मुरलीवर प्रीत, चार्टवर प्रेम, आपली लिंक बाबांशी जोडण्याचे प्रेम - हे असायलाच हवे. काही भाऊ-बहिणी म्हणतात. 'मुरलीत काय त्याच त्या गोष्टी असतात, बाबा रोज तेच तेच सांगतात. रचता, रचना, परमधाम, ३ लोक - हे तर मला कळले आहे. अरे कळले काय कळले - खरे कळले कधी म्हणता येईल, जेव्हा आपल्या जीवनात ह्या गोष्टी (बाबा ज्या मुरलीत सांगतात धारणेच्या) प्रत्यक्षात बघावयास मिळतील. ते तर काहीच दिसत नाही. मग काय कळले तुम्हाला? ज्ञान म्हणजे प्रत्यक्ष जीवनात त्या गोष्टी उतरणे. ज्ञान म्हणजे फक्त समज नव्हे. म्हणूनच या ३ गोष्टी तुम्ही जरूर तपासा १) चार्ट २) लिंक जोडणे (बाबांशी) ३) मुरली.

चार्ट फक्त सकाळी किंवा रात्री तपासला केला, विसरला, असे नको. सकाळी आठवण करता मुरलीच्या वेळी मग थेट नुमाशामच्या योगाला बसता - पण मध्ये किती तास गेले? ते ही मधून-मधून तपास करून तसा-तसा चार्ट भरत राहावे. ह्यात कोणतेही कारण नको. धर्मराज पुरीत कारणं द्याल तर बाबा पण खूप हुशार आहे बरं! त्यावेळी त्याचे 'बाबाचे' प्रेमळ रूप नसून धर्मराजाचे रूप असणार. कुठलेही कारण तेव्हा ऐकणार नाही. म्हणूनच आतापासून मुरलीवर विशेष ध्यान हवे.

***



# “खरी आध्यात्मिक सेवा”

**ब्र.कु. सूरज भाई, मा. आबू**

बाबांनी काही महान आत्म्यांच्या समोर एक मोठी गोष्ट सांगितली होती. तसे तर ते म्हणतात मी तुम्हा सर्व आत्म्यांना स्वघरी (मूलवतन) घेऊन जायला आलोय. तेव्हा तुम्हाला यावेच लागेल इच्छा असो वा नसो, तुम्हाला मजसोबत यावेच लागेल. त्या दिवशी अव्यक्त बापदादांनी म्हटले होते, ‘जोपर्यंत तुम्ही ब्राह्मण बनल्यानंतरचे कर्तव्य पूर्ण केले नाहीत, तोपर्यंत तुम्ही स्वगृही परतू शकणार नाहीत. कोणती आहेत बरं ती कर्तव्ये, कुणासाठी हे म्हटलंय – काही काही लोकांना म्हणजे मलाही का? ब्राह्मणपणाचे काही कर्तव्य असणारच ना ! आतापर्यंत तर आपला स्वत:चाच पुरुषार्थ चालू आहे) ते कर्तव्य आहे – सर्वांना मुक्तीचे वरदान देणे म्हणजे मुक्तीचा मार्ग दाखवणे. समजा एक ॲटम बॉम्ब एखाद्या जागी फुटतो, त्यात करोडो लोक नाहक मारले जातात. इच्छेविरुद्ध शरीर सोडावे लागल्याने, त्यांना मुक्तीचे वरदान (मुक्त करण्याची सेवा) द्यावे लागेल. हे ईश्वरी ज्ञानानुसार वागणाऱ्या ब्राह्मणांचेच श्रेष्ठ कर्म असणार. सृष्टिपरिवर्तनाच्या काळात ही मोठी सेवा ठरेल. बाबांच्या शब्दांत सांगायचे झाल्यास दु:खाचे (पहाड) डोंगर कोसळतील. आत्म्यांना दु:खातून मुक्त करणे हेच आपले कर्तव्य असेल अशावेळी.

आपत्तीच्या काळात भीतीचे वातावरण तयार होते. अशावेळी सर्वांना निर्भय अथवा भयमुक्त करणे आपलीच जबाबदारी असेल. त्यांना निर्भय बनविणे हीच आपलीही सेवा असेल.

आज बाबांच्या वतीने तुम्हाला एक मोठे कार्य सांगू इच्छितो दीर्घ परिवर्तनाची वेळ सुरू झालीय. लोकं अनपेक्षित समस्यांना तोंड देत आहेत. युद्ध, महागाई जगाला ग्रासतेय, अशावेळी आपल्या साधनेची प्रकंपने त्यांना मदत करणारी ठरावी. जणू आई जसे लहानग्याला थोपटून झोपवते ना, तसेच आपल्याला अशा भयभीत लोकांना शांत करावे लागेल. ज्यांना (बाबांकडून) खूप-खूप सुख-शांती मिळाली असेल तेच अशी सेवा करु शकतात. ज्यांनी स्वत: तपश्चर्या करून ईश्वराकडून आध्यात्मिक खजिने मिळवले असतील – ज्यांच्याकडे अशा शक्ती जमा आणि जागृत असतील. तेच ही सेवा करू शकतील. बाबांनीही हेच म्हटले होते. हेच ते ब्राह्मणांचे अती महान कर्तव्य आहे.

तर येणाऱ्या काळात सकारात्मक तरंग पसरवण्याची फार मोठी सेवा आपल्याला करावी लागणार. जसे करोनात झाले होते. – घरातले सगळे लोक मृत झाले – एकच जण वाचला. विचार करा त्या घरात किती दु:ख होते. अशावेळी त्या कुटुंबाचे सांत्वन करायला आपल्या बी.के. बहिणींना बोलावतात. साप्ताहिक कोर्स ठेवतात. शांतीसाठी प्रवचन ठेवतात. काही वेळेस ते एवढे दु:खात असतात, की ते हे सर्व ऐकू इच्छीत नाहीत. मग अशावेळी खूप चांगले योगाचे प्रयोग करून शांतीचे सकारात्मक तरंग पसरवून त्यांचे मन शांत करावे लागेल.

एकाग्रतेने केलेले कार्य फलदायी ठरते. सुखद परिणाम यावे यासाठी स्वत:मधील एकाग्रता वाढवावी – एकाग्रतेमुळे सर्व शक्तींची प्राप्ती होती. दूर बसून कुणाही व्यक्तीस शांत करू इतके साधनेचे बळ हवे. तीच खरी आध्यात्मिक सेवा आहे.

***

---

‘तुका म्हणे होय मनासी संवाद। आपुलाची वाद आपल्यासी।’
एकांतात काय करावे याकरिता साधकाला तुकोबांनी उत्तम मार्गदर्शन केले आहे.
स्वत:ला प्रेरित करण्यासाठी स्वत:शी संवाद साधणे ही एक सुंदर साधना आहे.



# एकटी तू गाणे गासी

**ब्र.कु. रुक्मिणी, मुळशी, पुणे**

माझं नाव रुक्मिणी भूमकर आहे. गाव नरे–आंबेगाव, तालुका मुळशी, जिल्हा पुणे. मला ३ मुलं आहेत. तिघांची ही लग्न झालीत. सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. पण बाबांच्या ज्ञानात म्हणाल तर मी एकटीच आहे. गेल्या १२–१३ वर्षांपासून मी ज्ञानात आहे. मला ज्ञान कसं मिळालं सांगते. पानसरे नावाची माता सेवाकेंद्रावर येते. ती पहुड गावात राहते. एकदा मी तिच्याकडे गेले होते. तेव्हा बोलता बोलता मला शिवबाबा आणि ज्ञानमार्गाचा परिचय झाला. तू सेंटरला येऊ शकतेस? मी लगेच हो म्हटलं. ही गोष्ट २००९ किंवा २०१० ची असावी. नीट आठवत नाही. पण मला हे ज्ञान खूप आवडलं. पानसरे मातेनी थोडं सांगितलच होतं. दादींनी पण शिवबाबाच ज्ञान सांगून साप्ताहिक कोर्स करा असं सांगितलं. फार आनंद वाटला. बाबाचं ज्ञान फारच वेगळं आहे हो. मी भक्ती करायची पण ज्ञानाची आवड जास्त वाटली.

आमच्या गावात काही सेंटर नाही. त्यामुळे पहुडला गेलं, की दीदी आधीच्या काही ज्ञानमुरलीचा संच मला देतात. अशा प्रकारे मी या मार्गावर चालू लागले. आजपर्यंत मी ८–९ वेळा मधुबनला गेले असेन बाबांना भेटायला. फार बरे वाटते. मी तुम्हाला माझा अनुभव सांगते, 'मी लौकिक अर्थाने फारशी काय काहीच शिकलेले नाही. पण मी मुरली वाचू शकते. बाबांनी मला वाचायला शिकवलं. शाळेचं तोंडही न पाहिलेली मी लोकांना नवल वाटते मला वाचायला कसं येते ते बघून. मुरली जरी हिंदीत असली, तरी मला ती कळते थोडी थोडी आता वाचून वाचून अनुभव होत गेला. सुरुवातीला फार अवघड जायचं वाचणं. पण आता जिद्दीने बाबांच्या मदतीने मी मुरली वाचते. मुरलीमुळे मी खूप शांत होत गेले. स्वभाव शांत झाला. मला पूर्वी फार राग यायचा, कुणी काही बोललं, अरे केलं, की मी कारे केलच म्हणून समजा. फटकन उत्तर द्यायचे. पण आता तसं नाही. कुणी काहीही बोलले तरी मी ऐकून घेते आणि स्वतःची शांती न ढळू देता शांतपणे उत्तर देते. बाबांच्या श्रीमतवर चालायचंच काही झालं तरी हा दृढ निश्चय केलाय मी. मुरलीमुळे मी (खूप) एकदमच शांत झालेय, असं स्वतःला तर जाणवतेच पण इतर लोक, घरातले आजुबाजूचे लोक ही तसं सांगतात. माझी अशाप्रकारे दिवसेंदिवस प्रगती होत आहे. कारण बाबांनी मुरलीत सांगितलेलं मी आत्मसात करण्याचा प्रयत्न करते.

मुरली कशी शिकले?

मुरली आधी ग म भ न असं अक्षर ओळख करत करत हळूहळू ते वाचायला सुरुवात केली. मग काही समजलं नाही की इतरांना विचारत विचारत त्याचा अर्थ कळायला लागला. मुरली वाचल्याशिवाय चैन पडत नाही.

मी शेतीचा व्यवसाय करते. ज्वारी, पावटाची शेती करते. शेती करताना मी बाबांची मदत घेते. वयोमानाप्रमाणे माझ्या जास्त लक्षात राहत नाही. पण बाबा खूप मदत करतात. कुठली गोष्ट हरवली आणि गवसत नसली की मी बाबांना विचारते, 'बाबा कुठे गेली हो वस्तू शोधा ना!' बाबांच नाव घेतलं की वस्तू लगेच गवसते. बाबा जिथे वस्तू ठेवली असेल, बरोबर त्याच जागी नेतात. खरचं जादू सारखं वाटत मला. बाबा म्हणतात न मी जादूगार आहे. खरंच आहेत ते!

शेतात काम करताना, खुरपणी, लावणी करताना एकटीच असले तर बाबांनाच सांगते कुणाला तरी पाठवा हो, बोलायला, मदतीला लगेच कु.णीतरी येतेच. आता गणपतीपासून ४ महिने मी शेतीच्या मशागतीचं काम केलं. एकटीच करायची मदतीला कुणीच नव्हतं. बाबांना म्हटलं, 'लई दमले मी बाबा' काय करू सांगा तरी! आणि हे टाळता येण्यासारखं ही काम

(पृष्ठ क्र. २२ वर)



# चंदन सान्निध्य

ब्र.कु. कविता, शांतिवन आबू रोड

रोज सकाळी उठता क्षणी प्राणेश्वर बापदादांना अंतःकरणातून धन्यवाद करते. मी त्रिमूर्ती दादींच्या समीप राहिले त्यांचे संगोपन लाभले, सेवा केली आणि अनमोल ज्ञान घेण्याचे सौभाग्य प्राप्त झाले. मी ज्ञान सरोवर मध्ये मनोहर दादीसोबत राहिले, प्रकाशमणी दादींसोबत ८ वर्ष राहिले. ईशु दादीना मागील २३ ते २४ वर्ष पाहत आले परंतु दादींच्या व्यक्तीगत सेवेत १५ वर्षे होते.

ईशुदादी प्रेमाची मूर्ती होत्या. ईशुदादींचा लौकीक परिवार धनाढ्य, संपन्न होता. दादींचे संस्कार त्यामुळे रॉयल व शांतचित्त होते. मी सदा त्यांना 'दादी माँ' म्हणत असे. कधी वाटायचे संतोषी माता आहे. जितक्या नम्रचित होत्या तेवढ्या गंभीर देखील होत्या. त्यांना पाहून नेहमी असा बोध होई की त्यांच्या जीवनातून जे शिक्षण (ज्ञान) मिळत आहे ते मला जीवनात पुढे जाण्यासाठी खूप मदत करत आहे. पहिली भेट दादीच्या प्रेमाची छाप खूप खोल हृदयामध्ये घर करून गेली.

एकदा दुपारी २.४५ वाजता दादी प्रकाशमणी यांच्या सांगण्यानुसार मी ईशु दादींकडे चेक देण्यासाठी गेले होते. जशी मी चेक घेऊन दादींच्या खोलीमध्ये पोहोचले, मला खूप शक्तिशाली लहरींची अनुभूती होऊ लागली. असे वाटले की इथे कोणी तपस्या करत आहे, शांतीची गहन अनुभूती होऊ लागली. ईशुदादी पलंगावर झोपलेल्या पाहून मला वाटले जस काही विष्णु नागाच्या शैय्यावर निश्चिंत होऊन झोपले आहेत.

मला पाहताच दादी म्हणाल्या कविता आहे? ये आणि उठून बसल्या. मी बोलले दादी तुम्ही झोपा. मी तर फक्त चेक द्यायला आली आहे. दादी म्हणाल्या, ''तू तर माझ्यापाशी पहिल्यांदाच आली आहेस'' असे बोलून त्यांनी मला स्वतःजवळ बसवून खूप प्रेमाने माझ्या डोक्यावरून हात फिरवला आणि मी पाहतच राहिले. मला बोलल्या ''तू दादींची सेवा खूप प्रेमाने करतेस.'' तू आज इथे आलीस मला खूप बरे वाटले. मी बोलले दादी, तुम्ही मला तुमची सेवा करण्याची संधीच देत नाही. त्यामुळे तुमच्याकडे येणेच होत नाही. तुम्ही मला तुमच्या सेवेची संधी द्या. आणि त्या पहिल्या भेटीतच दादींच्या प्रेमाची अमीट छाप माझ्या हृदयामध्ये उमटली. असे वाटले दादी बाबांसमान आहेत.

दादी स्वतःही हलक्या असायच्या आणि सर्वांना एका सेकंदात हलक्या करायच्या. दादी सदा साक्षीद्रष्ट्या होत्या. यज्ञामध्ये कितीही परिस्थिती वर–खाली होत असली तरीही दादींची स्थिती सदा अचल–अडोल असे. दादी नेहमी निर्लिप्त असायच्या. पूर्वी दादी स्वतः तयार होऊन ७ वाजता ऑफीसमध्ये पोहचायच्या, पण तब्येत बिघडल्यानंतर त्या मला ऑफीसमध्ये सोबत घेऊन जाऊ लागल्या. ऑफीसमध्ये कोणीही कोणाविषयी तक्रार केली की, दादी म्हणत हा यज्ञ कुणाचा आहे? यज्ञ बाबांचा आहे, या भंडारीचा मालक बाबा आहेत. त्यामुळे आपण कशाला त्रास करून घ्यायचा. मी मालक नव्हे मी तर फक्त निमित्त मात्र आहे, मालक बाबा आहेत. यज्ञामध्ये कोणत्याही गोष्टी वरती खाली झाल्या तरीही जबाबदार बाबा आहेत. सगळं काही बाबाच करत आहेत. मी फक्त कठपुतळी प्रमाणे नाचत आहे. असे बोलून दादी स्वतः हलक्या राहत असत. सर्वांना एक सेकंदात हलकं करत असत. दादी ऑफीसमध्ये जाऊन आनंदाने टाळ्या वाजवत आपले हात पसरून ओम शांती, ओम शांती म्हणत. सर्वांना प्रेमाने भेटून सर्व वातावरण बदलून देत असत, आम्हाला वाटे जणू स्वतः बाबा इथे येऊन आपल्या शक्ती इथे पसरवत आहे. खूप आनंदाचे वायुमण्डळ बनत असे.

त्यांनी मनमत कधीच मिक्स नाही केली. जेव्हा बाबा येत तेव्हा ईशुदादी डायरी–पेन घेऊन बसत आणि

यज्ञातील सर्व व्यवहाराच्या गोष्टी नमूद करत असत. ईशु दादींचा इतका साक्षी भाव रहात असे की सर्व माहीत असून देखील त्या कधीही बोलल्या नाहीत मला सर्व काही माहीत आहे. दादी स्वत:ला नेहमी गुप्त ठेवत असत. त्या नेहमी सांगत जेव्हा मला बाबांचा आदेश मिळेल तेव्हाच मी करेन, आपले मनमत त्यांनी कधीही मिक्स नाही केले.

**बाबांनी दादींना घड्याळ दिले.**

यज्ञाच्या सुरवातीच्या काळामध्ये एक दिवस बाबा ब्रह्मावत्सांसोबत बसले होते. तेव्हा बाबांनी निर्देश दिले की कोणाकडेही मौल्यवान आभूषण असतील तर ते मम्मा-बाबांकडे जमा करून द्यावे कारण मौल्यवान आभूषण जर स्वत:कडे असतील तर त्यामध्ये बुद्धी जाईल आणि अवस्था एकाग्रचित्त होणार नाही. तेव्हा सर्वांनी त्याचक्षणी आपली आभूषणे मम्मा आणि बाबांना समर्पित केली. त्या वस्तुंमधून बाबांनी एक घड्याळ उचलले व दादींना दिले. बाबा दादींना नेहमीच सोबत ठेवायचे आणि दादींना वेळ विचारत असत त्याव्यतिरिक्त दादींना काही पत्र व्यवहाराची सेवा किंवा पोस्टाद्वारे मुरली पाठवण्याची सेवा वेळेवर करावी लागत असे. दादींना दिलेले घड्याळ हे हाताच्या उष्णतेवर चाले. त्यामध्ये बॅटरी घालण्याचा खर्च होत नसे. त्यामुळे दादींना ते घड्याळ खूप प्रिय होते. त्यामध्ये सुद्धा दादी कटकसरी होत्या. दादींकडे एकापेक्षा एक खूप मौल्यवान घड्याळे भेट स्वरुपात आली असतील, परंतु दादींना बाबांनी दिलेले घड्याळच प्रिय होते. त्याच्या समोर लाखो किमतीची घड्याळे दादींना तुच्छ वाटत असत. दादी नेहमी ते घड्याळ सर्वांना दाखवत. त्या सांगत, ''हे घड्याळ बाबांनी विशेष मला भेट म्हणून स्वरुपात दिले आहे.''

**बाबांवरचे अतूट प्रेम**

दादी संपूर्ण दिवसभर बाबांची आठवण करत असत. रोज नियमित दादी तीन वेळा मुरली वाचत व नोट करत. रोज संध्याकाळी आम्हाला मुरली वाचून दाखवत आणि नोट करावयास सांगत. एकदा मुरलीमध्ये महावाक्य होते की ''बच्चे बाबा को भूल जाते हैं'' तेव्हा दादींनी मला विचारले, काय तुलाही बाबांचा विसर पडतो? मी सांगितले हो दादी, मी विसरून जाते. दादींनी विचारले तू बाबांची मुलगी नाहीस का? मी म्हटले मी बाबांची आणि तुमची देखील मुलगी आहे. तुम्ही आमच्या आई आहात. तेव्हा दादी बोलल्या मी आई नाही, मी तर बाबांची छोटी मुलगी आहे तुमच्याप्रमाणे. नंतर मी विचारले तुम्ही बाबांची आठवण कशी करता? तेव्हा दादींनी सांगितले मी बाबांची आठवण करत नाही. मी विचारात पडले ते पाहून दादी बोलल्या. जे त्यांना विसरून जातात त्यांना आठवणींची गरज पडते आणि मी बाबांना विसरत नाही तर मग आठवण कशी करू ! माझ्या प्रत्येक श्वासांमध्ये, माझ्या रोमारोमांत, माझ्या शरीराच्या प्रत्येक अंगामध्ये बस बाबा, बाबा बाबाच आहे; तर मग मी आठवण का करू. तो तर प्रत्येक वेळी माझ्या सोबत आहे. दादींचे अतूट प्रेम बाबांवर होते.

कधीही दादी कुठल्याही गोष्टीसाठी 'ना' करत नसत. कधी मी दादींना सांगायचे ''दादी आज आपल्याला इथे जायचे आहे तुम्ही याल? तेव्हा त्या म्हणायच्या तू बाबांना विचार मी दादींना घेऊन जाऊ? बाबा तुला सांगतील ते तू मला सांग. सकाळ असो वा संध्याकाळ किंवा अमृतवेळा दादींनी कोणत्याही गोष्टीसाठी ना कधीच केले नाही. त्या बोलायच्या निमित्तमात्र तू बोलतेस पण सर्व काही बाबा करत असतात. तुला निमित्त बनवून बाबा माझी सेवा करत आहेत. तू असं कधीही समजू नकोस की मी दादीची सेवा करत आहे. इतका बाबांवर अतुट निश्चय होता.

**दादी खूप मनमिळाऊ होत्या.**

दादी म्हणत ''माझा बाबा प्यारा बाबा, गोड बाबा, बाबा माझ्या हृदयात राहतो आणि मी बाबांच्या हृदयात राहते. दादींनी बराच अधिक काळ बाबांच्या सोबत घालवला. मम्मा, दादी-दीदींच्या सोबत घालवला. दादी सर्वांच्या सोबत जुळवून घेत, मोठ्यांच्या कामात उजवा हात बनून काम करत. कधीही कुणाच्या मनात हा प्रश्न येत नसे ईशुदादीं सोबत मी कशी राहू.

दादी बोलायच्या, बाबांनी मला क्लास करण्याचा पार्ट नाही दिला.

दादी नेहमी माझ्याजवळ सगळ्या दादींचा महिमा आणि वैशिष्ट्यांचे वर्णन करत असत. मी दादींना सांगितले, दादी तुम्ही मला इतक्या वेगवेगळ्या सर्वांची वैशिष्ट्ये यज्ञाच्या, दादींच्या मम्मा बाबांच्या सर्व गोष्टी मला सांगता तर तुम्ही क्लासमध्ये का सर्वांना सांगा ना. तर दादी बोलायच्या बाबांनी मला क्लास करण्याचा पार्ट नाही दिला, बाबांनी मला ऑफीसची सेवा दिली आहे, यज्ञाचा व्यवहार आणि भंडारीची सेवा दिली आहे. क्लास करायची व मुरली ऐकवण्याची

सेवा बाबांनी रतन मोहीनी दादी, प्रकाशमणी दादी, मनोहर दादी यांना दिली आहे. बाबांनी मला कधीच सांगितले नाही की मुली तू क्लास कर, मुरली ऐकव तर मग मी क्लास का करू! मी तुला ऐकवते तू जाऊन सर्वांना ऐकव. मी दादींना म्हणायचे दादी तुम्ही बाबांच्या सोबत राहिलात. तुम्ही जर क्लास केलात तर त्याचा प्रभाव जास्त पडेल. माझ्या ऐकवण्याने इतका प्रभाव नाही पडणार. मी तर दादी अजून लहान आहे. तर दादी बोलायच्या मी तर तुझ्यापेक्षा लहान आहे. मी तर बाबांच्या कुशीत बसते. अशा दादी इतके मोठे महान कार्य करत असून, यज्ञाची तिजोरी सांभाळत, कधीही त्यांना अहंकार नाही आला.

जे भोजन बाबा स्वीकार करतात, तेच भोजन आपण स्वीकारायचे. जेव्हा मी दादींना भोजन द्यायची तेव्हा दादी नेहमी विचारायच्या बाबांनी भोजन स्वीकारले? प्रथम बाबांना नैवेद्य दाखवल्यानंतरच मी भोजन ग्रहण करणार. एकदा दादींच्या वाढदिवसाच्या कार्यक्रमामध्ये मुन्नी दीदी आणि मोहिनी दीदी यांना भोजनासाठी रात्री उशीर झाला. मी दादींना म्हटले दादी तुम्हाला रात्री १०.०० वाजता झोपायचे आहे त्यासाठी आधी तुम्ही भोजन करून घ्या. पण दादी भोजन करण्यासाठी तयार होत नव्हत्या. दादी म्हणाल्या मी एकटी भोजन स्वीकारणार नाही. परंतु नंतर मुन्नी दीदीच्या सांगण्यावरून दादींनी भोजन ग्रहण केले आणि सोफ्यावर बसल्या. जेव्हा मी भोजन खाण्यासाठी बसले तेव्हा कळले तुरईची भाजी कडू बनली होती. मी दादींना विचारले तुम्हाला भाजी कडू नाही लागली, तेव्हा दादी बोलल्या जेव्हा बाबांना भाजीचा नैवेद्य दाखवला आहे, जर बाबांनी भाजी खाल्ली तर मी सुद्धा खाणे आवश्यक आहे. आम्हाला सर्वांना आश्चर्य वाटले. दादीचे बाबांवर खूप मनापासून प्रेम होते. जे बाबा स्वीकारतात ते मी खाणार.

**दादी सदा निर्लिप्त असायच्या**

दादी सागराप्रमाणे सर्व गोष्टी अंतर्मनात सामावून घ्यायच्या. कधीही कोणत्याही गोष्टीचे वर्णन करत नसत. डॉक्टर जेव्हा त्यांना विचारायचे तुम्हाला काही त्रास आहे ? तेव्हा त्या म्हणत मी तर, तुम्हाला भेटण्यासाठी आली आहे. जेव्हा मी डॉक्टरांना सांगायचे की दादींना गुडघेदुखी आहे तेव्हा मला सांगायच्या की तू वर्णन का करतेस की दादींना हा त्रास होत आहे. तेव्हा मी त्यांना बोलायचे दादी तुम्ही तर देहभान जिंकले आहे त्यामुळे तुम्हाला त्रास जाणवत नाही. परंतु मला तर कळत आहे. तेव्हा त्या बोलायच्या मी ok नाही डबल ok आहे. दादी बाबांच्या आठवणींमध्ये इतक्या मग्न असायच्या. त्या शरीर व शरीराच्या भानापासून निर्लिप्त असायच्या.

**दादी खूप निम्रचित्त होत्या.**

दादी खूप नम्र होत्या, कधीही का, केव्हा, कधी अशा प्रश्नांमध्ये जात नसत. एकदा पांडव भवनमध्ये एक भाऊ दादींकडे आले. ''माझी आई आजारी आहे आणि मला घरी जायचे आहे त्यासाठी मला खर्चासाठी काही पैसे हवेत असे सांगून तो भाऊ सेवेसाठी निघून गेला. मी दादींसाठी ज्यूस घेऊन गेले. दादींनी मला सांगितले की एका भाईची आई आजारी आहे तेव्हा त्याला पैसे देऊन येते. मी बोलले की तो भाऊ स्वत: येईल त्यावर दादी बोलल्या जर तो सेवा सोडून आला तर त्याला ओरडा मिळेल; त्याला सेवेमधून केव्हा वेळ मिळेल, मी तर फ्री आहे आणि दादी स्वत: जाऊन एका पाकीटात पैसे भरून त्याच्या जागी जाऊन देऊन आल्या. अशा दादी स्वत: नम्र होऊन सर्व कार्य स्वत:च्या हाताने करत. अशी कितीतरी शिकवण मला दादींच्या जीवनातून प्राप्त झाली.

**आनंदाचे वायुमण्डळ बनवायच्या**

विश्वकल्याणी भवनमध्ये एकाच खोलीत दादी आराम करायच्या, जेवण करायच्या आणि भाऊ बहिणींना भेटायच्या सुद्धा. एकदा मी दादींना फळ खायला दिले. तेवढ्यात दरवाजाची घंटी वाजली ४ वरिष्ठ भाऊ बहिणीं दादींना भेटण्यासाठी आले होते. मी त्यांना १० मिनिटे बसायला सांगितले आणि ही गोष्ट दादींना ऐकू गेली आणि बोलल्या बाबांच्या घरी, बाबांच्या यज्ञामध्ये भंडारी देण्यासाठी कोणी आले आणि तू त्यांना बसण्यास सांगते. दादी त्या सर्वांना आधी भेटल्या आणि आपले दोन्ही हात पसरवून त्यांचे स्वागत केले. ''वाह माझे भाऊ आले, वाह माझ्या बहीणी आल्या'' ही तर बाबाचे मुले ''आदिरत्न' आहेत किती लाडकी मुले आहेत. अशा पद्धतीने दादी उत्साहाने सर्वांना भेटल्या आणि आनंदाचे वातावरण बनवून टाकले. दादींनी सर्वांना आपल्या सोबत बसवून, आपल्या हाताने खूप प्रेमाने ताटलीत फळे ठेवली व सर्वांना एक-एक फळाचा तुकडा खाऊ घातला. ते गेल्यानंतर मी दादींना बोलले दुसरे फळ मी कापून आणते. तेव्हा त्या म्हणाल्या, 'नाही'. बाबांनी सर्वांना फळ खाऊ घातले आणि त्यांच्या डोळ्यामधील चमक आणि चेहऱ्यावरच्या हसूने माझे पोट भरले.''

दादींनी दिलेले आशीर्वाद फलीभूत होताना पाहिले. एकदा दादींना भेटण्यासाठी काही बहिणी आल्या होत्या. दादींनी मला विचारले. यांनी बाबांच्या घरी इतकी भंडारी दिली आहे, तेव्हा तू त्यांना काय देणार? कॉटेजमध्ये दादी आपल्याजवळ काही ठेवत नसत आणि विश्वकल्याणी भवनमध्ये येऊन आम्हाला दोन ते तीन महिनेच झाले होते. मी दादींना सांगितले ''दादीजी तुमच्या जवळील टोली, वरदान, सफरचंद आहे ते देईन आणि तुम्ही आपल्या मुखाद्वारे त्यांना वरदान द्या. तेव्हा त्या बोलल्या तुला दोन दिवसांपूर्वी जे कपडे मिळाले होते ते तू तुझ्या जवळ ठेवणार आहेस का? ते घेऊन ये आणि ह्यांना दे, बाबा तुला भरभरून देतील मी साडी त्या बहिणींना दिली. बहिणी भट्टी करण्यासाठी आल्या होत्या. त्यांनी काही महिन्यांनंतर ३०० साड्या आणून दादींच्या समोर ठेवल्या. दादींनी जे वरदान दिले होते, ''तू दिलेस तर बाबा तुला भरपूर देतील'' ते फलीभूत होतांना पाहिले. असे दादींचे वरदानी शब्द सिद्ध होताना पाहिले.

लॉकडाऊनमध्ये जेव्हा लोकं येण्याचे बंद झाले तेव्हा एका दिवशी दादीं मला बोलल्या आज काहीच भंडारी नाही आली. मी कशी जेवण खाऊ.

दादींना वाटले की कदाचित कुणाला माहीत नसेल की मी इथे राहते, तेव्हा दादी आंब्याच्या झाडाखाली खुर्ची टाकून बसल्या आणि बोलल्या की, मी इथेच मुरली वाचत बसते मला बघून कोणीतरी येईल आणि भंडारी देईल. तेव्हा खगेंद्र भाईने एका पाकीटात ५०० रुपये घेऊन दादींच्या हातात दिले. सांगितले 'दादी ही भंडारी कोणीतरी दिली आहे.' दादी म्हणाल्या 'कोणी दिली मला त्यांना भेटायचे आहे.' तेव्हा तो भाऊ त्यांना बोलला, 'तो भोजनासाठी गेला आहे तुम्ही देखील भोजन खाऊन घ्या.' तेव्हा दादींनी भोजन खाल्ले आणि विचारत राहिल्या ते केव्हा येतील? भंडारी जशी दादींना मिळत असे तसे त्या गोलक भाईंकडे लगेचच देत असत.

**सबसे बडा डॉक्टर बाबा है**

डोकेदुखीचा त्रास निरंतर असल्याकारणाने मी एकदा चेकअपसाठी डॉक्टर सुधीर शाहांना भेटण्यासाठी गेले. सर्व चेकअप केल्यानंतर त्यांनी सांगितले तुमच्या डोक्याची नस कमकुवत आहे आणि त्यांनी ऑपरेशन करण्याचा सल्ला दिला. सकाळी ७ वाजता मी शांतीवनमध्ये पोहोचले तेव्हा दादी माझ्या स्वागतासाठी फुलांची माळा घेऊन उभ्या होत्या. खूप प्रेमाने मला जवळ घेतल्यानंतर त्यांनी मला विचारले डॉक्टरांनी काय सांगितले? मी रडायलाच लागले. मी बाबांच्या खोलीत जाऊन रडायला लागले. दादींनी मला बोलावले आणि डॉक्टरांनी सांगितलेले सर्व त्यांना सांगितले. दादी बोलल्या इतकी छोटीशी गोष्ट आणि तू घाबरून गेली. डॉक्टरांनी सांगितले आणि तू ती गोष्ट मानलीस. मग दादींनी माझ्या डोक्यावरून हात फिरवला आणि मला अनुभव झाला जसे स्वयं ब्रह्माबाबा येऊन माझ्या डोक्यावरून हात फिरवत आहेत आणि हळू हळू माझा त्रास संपत आहे. दादी बोलल्या तू तर अगदी मनापासून बाबांची सेवा करतेस, सगळ्यात मोठा डॉक्टर बाबा आहे तो तुला ठीक करणार. नंतर आजपर्यंत मला परत कधीही डोकेदुखीचा त्रास नाही झाला आणि औषधेही खाण्याची गरज नाही भासली. प्रेम, ममता आणि सहनशक्तीच्या देवी होत्या. प्रत्येक गोष्ट स्वत:मध्ये सामावून घेत, मुखाद्वारे कधीही काहीही बोलत नसत. मला आठवत नाही की दादीं कधीही स्वत:हून बोलल्या असतील की मला तहान लागली आहे. मी स्वत: त्यांच्यासाठी पाणी घेऊन उभी राहत असे. जसे काही बाबाच मला प्रेरित करत आहेत.

**बाबांची ठेव**

अगदी सुरवातीची गोष्ट एकदा दुपारी मी दादींचे कपाट साफ करत होते. तेव्हा मला एक रुपया मिळाला. दादींना मी सांगितले दादी तुमच्या कपाटात मला खजिना मिळाला आहे. एक रुपया बघून दादी बोलल्या हे कसे राहिले आणि कोणी दिले होते? ही तर चांगली गोष्ट नाही. असं बोलून दादी एक रुपया घेऊन ऑफीसमध्ये गोलक भाईंकडे दिले आणि सांगितले कविताला कपाट साफ करताना हा एक रुपया मिळाला. हा कसा राहिला मला माहीत नाही. गोलकभाई बोलले दादी तुम्ही कमाल करता एका रुपया तुम्ही नंतरदेखील देऊ शकता परंतु दादी बोलल्या हा एक रुपया नाही ही तर बाबांची ठेव आहे. तेव्हा हा एक रुपया माझ्याकडे कसा काय राहू शकेल. कधी मी दादींना म्हणे दादी जर तुमची परवानगी असेल तर मला मार्केटमधून काही गोष्टी आणायच्या आहेत. तेव्हा दादी बोलायच्या माझ्याकडून नाही, ऑफीसमध्ये जा गोलकभाईंकडून लिहून घे, पैसे घे आणि तुझे काम झाले

(पृष्ठ क्र. २२ वर)



# युवाशक्तीच्या कर्णधार : राजयोगिनी दादी रतनमोहिनीजी !

**ब्र.कु. हेमंत, शांतिवन**

युवाशक्ती महान आहे! राष्ट्रनिर्माण व जनकल्याणाचा आधार युवा आहे! म्हणूनच ब्रह्मातनी अवतरलेल्या प्रभूपित्याने नवयुग रचण्यासाठी युवाशक्तीची निवड केली. युगपरिवर्तक ब्रह्माबाबांनी बाल-किशोरांना आत्मिक ज्ञान व दिव्यगुणांचं शिक्षण देऊन, सत्ययुग स्थापनार्थ चारित्र्यसम्पन्न युवा-सेनेचं सर्जन करायला शाळा उघडली व कुशल शिल्पकार बनून युवा-मूर्ती घडविल्या, त्यातील एक दिव्यमूर्ती, युवा-मनातली सुप्त शक्ती जागवून, युवा-ह्दयात उमंग-उत्साहाचं उधाण आणणाऱ्या, युवाजगत सम्राज्ञी, 'राजयोगिनी दादी रतनमोहिनीजी' युवाशक्तीच्या कर्णधार होत्या! निराशेच्या अंधारात आशेचा किनारा दाखवणाऱ्या दादीजी तर युवांसाठी चैतन्य दीपस्तंभ होत्या. शंभर वसंत पाहणाऱ्या चिरयुवा शतायु दादी असीम ऊर्जेच्या भाण्डार होत्या. पवित्रतेच्या प्रतिमूर्ति दादींच्या आदर्श चारित्र्याने प्रेरणा घेऊन लाखों युवा भाऊ-बहिणी अध्यात्म-पथावर अग्रेसर झाले अन् यशाचे गौरीशिखर गाठले..

दादींचा दैहिक जन्म २५ मार्च १९२५ ह्या शुभदिनी सिंध हैद्राबाद येथील एक सम्पन्न श्रेष्ठ कुळात, भक्तिभाव सम्पन्न गर्भश्रीमंत कुटुंबात झाला. पिता 'खुशीराम' व माता 'देवी' यांनी ह्या दिव्य-कन्यारत्नास नाव दिलं 'लक्ष्मी!' तर शिवपित्याने अव्यक्त नाम दिलं 'रतनमोहिनी!' जसं नाव, तसे गुण ह्या म्हणी प्रमाणे दादीजी ज्ञान सागराच्या तळाशी जाऊन ज्ञानाचे हीरे मोती आणत, म्हणून ब्रह्माबाबा दादींना म्हणत,'रतन बच्चीं तर ज्ञान-रत्नांची खाण आहे!' दादींच्या मातोश्री श्रीकृष्णाची खूप भक्ति करत असत, दादींचेही बालपणापासून भक्तीचे संस्कार होते. गिरधर गोपालची दिवानी मीरा समान दादीही प्रभु-प्रेमात मग्न होऊन भक्ती करत असत. त्या वेळी सिंध हैद्राबामधे सर्वत्र ओममण्डलीचीच चर्चा होत होती. दादींच्या आई ओममंडळीत जात असत. एकदा दादी आई सोबत ओममण्डळीत गेल्या. सतसंगात 'ओम'चा सुमधुर ध्वनी गुंजत होता, तिथे जाता क्षणीच दादी एकदम सायलेंस (शांत अवस्थेत) मधे गेल्या. देहभान विसरुन दादी स्वीट सायलेन्सच्या (गोड शांतीच्या) सागरात बुडाल्या. दादींची ती अद्भुत परमानंददायी देहातीत स्थिति होती! दादी अशरीरी अवस्थेत दीड तास एकाच जागेवर, एकरस स्थितीत ध्यानमग्न होऊन बसल्या होत्या! सर्व श्रोते निघून गेले, तरीही दादींना कळलच नाही सत्संग कधी संपला. त्या परमशांतींच्या चुंबकीय आकर्षणाने दादी नित्यनेमाने ज्ञानामृत प्राशन करायला सत्संगात जाऊ लागल्या व अतीन्द्रिय सुख घेऊ लागल्या..

पिताश्री ब्रह्माबाबा त्या वेळी काश्मिरला गेले होते. बाबा तेथून परतल्यावर दादींची बाबांशी भेट झाली आणि प्रथम मिलनातच दादींना ठाम निश्चय झाला बाबाच त्यांचे पिता आहेत व त्या ईश्वरी परिवारातल्या आहेत. सुरुवातीला दादींना घरुन परवानगी नव्हती. दादी अभ्यासात खूप हुशार होत्या, त्यामुळे नातेवाईकांची इच्छा होती त्यांनी खूप शिकावं व पुढे जावं. ब्रह्माबाबांनी नुकतीच शाळा उघडली होती. त्यात ज्ञानाचेच धडे दिले जात, त्यासवे हिंदी व इंग्रजी भाषाही शिकवल्या जात. दादींना शिक्षणात खूप रस होता, म्हणून दादींनी बाहेरच्या शाळेत शिकण्याऐवजी बाबांच्या बोर्डिंगमधे शिकायचा विचार केला. म्हणून दादींना नातेवाईकांनी सहजपणे परवानगी दिली. बाबांच्या बोर्डिंगमधे तीन वर्ग होते, पहिल्या वर्गात छोटी मुलं, दुसऱ्या वर्गात मधल्या वयाची मुलं तर तिसऱ्या वर्गात मोठी मुलं होती. दादींना तिसऱ्या वर्गात प्रवेश मिळाला. आत्मिक विद्या घेता-घेता दादींचा निश्चय झाला इतकं श्रेष्ठ ज्ञान परमात्म्यां शिवाय कुणीही देऊ शकत

नाही. दादी जेव्हा ब्रह्माबाबांच्या समोर जायच्या, तेव्हा बाबांना साधारण रुपात न पाहता, बाबांना विष्णुच्या रुपातच पहायच्या. त्याद्वारे दादींचा बाबांशी सहजपणे बुद्धियोग जोडला गेला. बाबांद्वारे ज्ञानाच्या श्रेष्ठ गोष्टी ऐकून दादींना नारायणी नशा चढत असे त्यांना वाटे आपण श्रेष्ठ जीवनाचे भाग्य घेऊन जन्माला आलोय.

ब्रह्माबाबा हैद्राबादहून कराचीला गेले, दादीही बाबांसोबत कराचीला गेल्या. दादींना ब्रह्माबाबांच्या सानिध्याचे अहो सौभाग्य लाभले. दादीजी प्रातःकाळी प्रभु प्रियतमच्या प्रेमात तल्लीन होऊन शक्तिशाली योग करत. बाबा ज्ञानाची वृष्टी करत, दादी त्या ज्ञान रत्नांचं तन्मयेतेने मनन-मंथन-चिंतन करत, बाबांनी वर्णन केलेल्या ज्ञानबिंदूंवर आपसात विचारसागरमंथन करत. कुणीही येवो, ज्ञानचर्चेशिवाय कोणतीही गोष्ट दादींच्या मुखी येत नसे. त्यामुळे दादींची मायावी दुनियेपासून सहजपणे बुद्धि हटत गेली. बाबा म्हणत, 'पुत्री तू तर शिवशक्ति आहेस!' दादींना अनुभव होत असे शिवपित्याने शक्तीस्वरुप बनवून साऱ्या विश्वाचं कल्याण करायला माध्यम बनवलयं. दादी आजीवन जगतसेवा करत राहिल्या. बाबा योगाचे कार्यक्रम देत, दादी बाबांच्या सूचनेप्रमाणे गहन तपस्या करत. कराचीत दादी १४ वर्षं योगभट्टीत तावून सलाखून सोन्यासारख्या तेजस्वी झाल्या.

कराचीत अल्लाबक्श नावाचे पंतप्रधान होते. ते ब्रह्माबाबांना थेट येऊन भेटत. बाबा त्यांना मुलांच्या वर्गात घेऊन जात. ते मुलांचे संवाद ऐकून खूपच प्रभावित होत, त्यांच्यावर चांगली छाप होती की हे भगवंताला मानणारे 'खुदा परस्त' लोक आहेत आणि विश्वकल्याणाच्या महान कार्यात समर्पित आहेत. जरी नंतर भारत-पाकिस्तान दोन्ही देश वेगवेगळे झाले, तरी तिथल्या सरकारची इच्छा नव्हती ब्रह्माबाबा व ब्रह्मावत्सांनी पाकिस्तान सोडावं. पण अखेर तो क्षण आला, परमात्म आदेशानुसार शिवशक्ति सेना कराचीहून बोटीत बसून भारतात निघाली. ओखा बंदरावर उतरून मोठ्या सभेत ओखा निवासींना शिवसंदेश द्यायचा कार्यक्रम बाबांनी निश्चित केला होता, पण स्टीमर लेट झाल्याने प्रोग्राम झाला नाही. ट्रेन पकडून ब्रह्मावत्स आबूला आले.

आबू पर्वताची डोंगरी हवा-पाणी, कराचीच्या समुद्र तटीय जल-वायू पासून भिन्न होती, त्यामुळे सर्वांच्या तब्बेतीवर थोडा प्रभाव पडला, पण नंतर योगबलाने सर्व ठीक झाले. क्लासनंतर पिताश्री ब्रह्माबाबा व ब्रह्मावत्सांबरोबर दादी रतनमोहिनीजी फिरायला जात डोंगरावर तपस्या करता. एकदा माऊंट आबूहून आबू रोडपर्यंत सर्व पायी आले, तिथे मोठ्या सभेत बाबांनी संबोधित केलं आणि दादींनी सर्वांना परमात्म परिचय दिला. बृजकोठी मधे १९५० पासून १९५४ पर्यंत राहिले, तिथे एक साप पॅसेजमधे येऊन बसायचा, पण कुणाला काही करत नसे, लोक असं म्हणत साप रक्षक बनून येतो. बृजकोठीच्या मागे मोठं जंगल होत, रात्री सिंहगर्जना ऐकायला येई, पण कोणताही अपघात झाला नाही. दादींना निश्चय होता 'भगवान हमारे साथ है, तो डरने की क्या बात है!' दादीजी ऊंच-डोंगरांवर बसून योग करत, तेव्हा त्यांना वाटत असे कशा प्रकारे विश्वपिता दादींना समस्त विश्वाचा मालक असल्याचा अनुभव करवत आहेत.

रतनमोहिनी दादीच ईश्वरी महावाक्यांना ज्ञानमुरलीच्या रुपात लिहायला निमित्त बनल्या-हा ही एक प्रेरक प्रसंग आहे-साकार बाबा एके दिवस बागेत फिरत होते, एका सखी सोबत बागेत बसून दादी रतनमोहिनी काहीतरी लिहीत होत्या. बाबांनी पाठीमागे येऊन पाहिलं. बाबांना अचानक आलेलं पाहून दादी थोड्या दचकल्याच. बाबांनी विचारलं, 'मुली, काय लिहीत आहेस? दादी म्हणाल्या, 'बाबा, ते मी.. ते मी..' बाबांनी विचारलं 'सांग, मुली, सांग, काय लिहिलयं?' दादी म्हणाल्या, 'बाबा, ही आजची (ज्ञान)मुरली आहे, ऑलमाईटी बाबांनी सांगितलेले मुरलीचे ज्ञानबिंदू लिहिलेले आहेत.' बाबा म्हणाले, 'अच्छा! आलमाईटी बाबांचे मुद्दे आहेत!' बाबांनी दादींच्या हातातून पानं घेऊन पलटले. बाबा मुद्दे वाचून अति प्रसन्न होऊन कौतुक करत म्हणाले, 'बच्ची, ही तर खूप छान गोष्ट आहे. बाबांचे जे अनन्य ब्रह्मावत्स दूर-दूर राहतात, त्यांच्यासाठी तर हा गरम-गरम हलवा (शिरा) आहे. बाबांना हे वाचल्यावर इतकं छान वाटतयं, तर वत्सांना किती छान वाटेल! ज्यांनी ही महावाक्य ऐकली नाहीत त्यांच्यासाठी तर हे हिऱ्या समान आहेत. हे एक-एक ज्ञानरत्न मुलांचं पद्मापद्म भाग्य बनवतील.' त्यानंतर बाबांनी मुरली लिहिण्यासाठी दादींना नियुक्त केलं. ईशु दादी शॉर्टहॅण्डमधे लिहीत. नंतर कार्बन कापी काढली जाई व लिथो करुन पाठवली जाई. मुरली द्वारे ज्ञान रत्नांचा खजिना ब्रह्मावत्सांना

देण्यासाठी निमित्त बनून, रतनमोहिनी दादींनी 'ज्ञान रत्नांवर मोहित होणाऱ्या रतनमोहिनी ' हे शिवपित्या पासून प्राप्त झालेले वरदानी अव्यक्त नाव सार्थक केलं!

बृजकोठीमधून सर्व दादीं सेवेसाठी निघाल्या. हरिद्वारच्या सम्मेलनात गंगे दादींनी खूप सुंदर प्रवचन केलं. त्याने प्रभावित होऊन जपानहून आलेल्या एका भावाने जपानमधे होणाऱ्या विश्वशांती सम्मेलनचं निमंत्रण दिलं. तेव्हा बाबांनी रतनमोहिनी दादींसोबत प्रकाशमणी दादी व आनंदकिशोर दादांसोबत पहिल्यांदाच सन् १९५४ मधे जपान यात्रेकरता पाठवलं. दोन्ही दादी सेवार्थ जपानला पोहचल्या, इकडे बाबांना थोडी चिंता वाटली विदेशात दादींना भोजन ठीक प्रकारे मिळते की नाही? म्हणून बाबांनी पत्र लिहिलं. परदेशात तुम्हाला जर खाण्या-पिण्याची गैरसोय होत असेल बाबांचा सल्ला आहे की तुम्ही तेथे मशीन द्वारे बनलेले ब्रेड व बिस्किट खाऊ शकता. दादींनी उत्तर लिहिलं, 'बाबा, आम्ही जे काही खातो, त्याचा आधी तुम्हाला नैवेद्य दाखवतो आणि नंतरच खातो. जर आपण हे (मशीनने बनलेले ब्रेड बिस्किट) स्वीकार करणार असाल तर आम्ही इथे खाऊ. बाबांनी उत्तर दिलं, 'मुलींचं पत्र मिळालं, वाचून मन हर्षित झालं, तुम्ही मुली नियम-मर्यादांमधे पक्या आहात, वाह! तुम्ही तर रामाला जिंकणारे माझे लव-कुश आहात! बाबांच्या वरदानाने दोन्ही दादी अन्नशुद्धीची धारणा करुन परीक्षेत पास झाल्या.

रतनमोहिनी दादींनी आधी बाहेरचं जग पाहिलेलं नव्हतं. लोक नवे, चेहरे नवे, पोषाख वेगवेगळे होते. एक फिलीपनी ग्रुपमधे महिला पुरुषांच्या वेशात अन् पुरुष महिलांच्या वेशात दादींनी पाहिलं तरीही आश्चर्य न करता, दादींनी हेच चिंतन केलं की बाबांनी ह्या विदेशींची सेवा करायला इतकं दूर पाठवलंय, म्हणून त्यांना संदेश देऊन, चांगली सेवा करुन रिझल्ट काढूनच जायचं - हे उद्दीष्ट बाळगूनच दादी सेवा करत राहिल्या. जपानची मुख्य भाषा जपानी होती. दादी जपानी भाषा थोडीफार शिकल्या. दादी आधी जपानी भाषेत व नंतर इंग्रजीत ज्ञान देत असत. सम्मेलन पार पडल्यावर दादीजी मोठ-मोठ्या संस्थांमधे जाऊ लागल्या. एकदा अनानाई येथूनही निमंत्रण मिळाले, बुद्धिस्ट संस्थेतही दादींना बोलवण्यात आले. दादी कल्पवृक्षाच्या चित्राद्वारे ज्ञान देत, ते त्यांना आवडत असे. बुद्धिस्ट लोकांजवळ मोठ-मोठ्या मशीन्स होत्या, त्यांनी कल्पवृक्षाचे चित्रं छापून दिले. अशा प्रकारे रतनमोहिनी दादी चार महिने जपान, तीन महिने सिंगापूर, तीन महिने हाँककाँग व एक महिना पिनांगमधे राहिल्या.

आरंभी दादींचे सिंधी नातेवाईक ईश्वरी ज्ञानाला सन्मान्य मानत नव्हते. जेव्हा त्यांना कळलं दादींना जपानहून निमंत्रण आलंय आणि तेथे जाऊन दादींनी छान सेवा केली, दादींच्या जपानमधे केलेल्या सेवेने प्रभावित होऊन सिंधी समाज जपान, हाँगकाँग, सिंगापूर येथे निमंत्रण देऊ लागले. दादीजी सिंगापूरला गेल्या, तिथे गुजराती कम्युनिटीने ज्ञान प्राप्त केलं. एक गुजराती भाई कांतिलाल शाह यांनी निमंत्रण देऊन स्थान दिलं. दादीजी तिथे १५ दिवस राहिल्या, कांतिलाल भाई प्रातःकाली दादींसोबत ४ ते ५ वाजेपर्यंत योग करत नंतर ज्ञानही ऐकत, त्यांचा निश्चय झाला की ह्या ईश्वरी ज्ञानाने जीवन श्रेष्ठ बनेल, त्यांच्याद्वारे गुजराती ग्रुपच्या प्रेझिडंट सेक्रेटरीने १५-१५ दिवसाचा वेळ दिला, त्या ग्रुपशी सम्पर्क वाढल्याने दादीजी पत्रव्यवहाराच्या माध्यमाने ज्ञान देत राहिल्या. परतीच्या प्रवासात दादीजी जलमार्गाने चेन्नईला पोहचल्या, तेथून बाबांनी त्यांना चित्रकुटमधे सम्मेलनात पाठवलं. दिल्ली, लखनऊ, कानपूर व अमृतसर ह्या शहरांमधे सेवा करुन दादीजी आबू आल्या, तेव्हा यज्ञ बृजकोठीहून कोटा हाऊस व धौलपूर हाऊसमधे शिफ्ट झाला होता. बाबांनी दादी प्रकाशमणिजी, दादी रतनमोहिनीजी व दादा आनंदकिशोरजी यांचे खूप उत्साहाने स्वागत केलं.

आबूत त्याकाळी अति पाऊस होत असे, दोन-दोन महिने ढगांमधे सूर्य लपलेला असे. हिवाळ्यात सहन न होणारी कडाक्याच्या थंडीत राहणं मुश्किल होऊन जाई। त्यातच यज्ञाचा आर्थिक चणचणीचा काळ होता, म्हणून बाबांनी दादींना सेवार्थ लौकिक नातेवाईकांकडे पाठवलं. जपानहून परतल्यावर रतनमोहिनी दादी मुंबईला गेल्या. दादींच्या नातेवाईकांनी कोलाबा मधे घर घेऊन दिलं, तेथे आई 'देवी माता' सोबत राहून, मुंबईत सेवा करु लागल्या, दादी रतनमोहिनीजी १९५६ ते १९६९ पर्यंत मुंबईत सेवारत होत्या. मधे-मधे दादी मधुबन येत. ह्याच कालावधीत दादी कोलकात्यात रायबगान सेवाकेंद्र स्थापन करायला निमित्त बनल्या. १९७१ मधे शीलइंद्रा दादी, डॉं निर्मला दीदी, जगदीश भाई, रोजी बहन, रमेश भाई व उषा बहन

यांचा एक ग्रुप अमेरीका व लंडन गेला होता, तो ग्रुप परतल्यावर दादी रतनमोहिनीजी सेवार्थ लंडनला गेल्या. दादीजी जून १९७२ ते जानेवारी १९७४ पर्यंत लंडन येथे राहिल्या, त्यावेळी प्रदर्शनी पाहायला लोक येऊ लागले अन् त्यातून लंडन मधे पहिलं सेवाकेंद्र स्थापन करायला दादी रतनमोहिनीच निमित्त बनल्या, अशा प्रकारे रतनमोहिनी दादींनी विदेश सेवेचा पाया रचला.

ईश्वरी सेवेचा विस्तार होत होता, त्यामुळे दादी रतनमोहिनीजी मधुबन मध्ये आल्या. दादी कन्यांना राजयोगी शिक्षिकेचं प्रशिक्षण देऊ लागल्या. एक उत्तम प्रवीण प्रशिक्षिका बनून हजारों कन्यांना दादींनी राजयोग शिक्षिका बनवलं. रतनमोहिनी दादीच मान्यताप्राप्त सेवाकेंद्रांचं सर्टिफिकेट देण्याकरिता नियुक्त होत्या. दादीच सर्व समर्पित टीचर्स बहिनी व समर्पित भाऊंचे समर्पणाचे डाक्यूमेंटस् (कागदपत्र) ही सांभाळत. दादीजी राजस्थान सेवाक्षेत्राच्या प्रमुख संचालिका (राजस्थान जोन इंचार्ज) ही होत्या. सन् १९८५ मधे भारत एकता युवा पदयात्रा आयोजन करण्यात आली, त्यावेळी युवा प्रभाग बनला आणि रतनमोहिनी दादींना युवा प्रभाग अध्यक्ष बनवलं गेलं. दादींच्या कुशल मार्गदर्शनात युवा मेटाडोर रैली, स्वर्णिम भारत युवा पदयात्रा व सायकल यात्रा काढल्या गेल्या, भारत वर्षात युवा महोत्सवांचे आयोजन करण्यात आले. तसच 'टच लाईट' 'दिव्य दर्पण' सारख्या सेवा-योजना साकार झाल्या. दादीजी शेवटपर्यंत युवा प्रभागाचे प्रत्येक कार्य उमंग-उत्साह व स्वतः सम्पूर्ण सक्रियतेने करत राहिल्या. राजयोगिनी हृदयमोहिनी दादींच्या अव्यक्त-आरोहणा नंतर सन् २०२१ मधे दादी रतनमोहिनीजी ब्रह्माकुमारीजच्या आंतरराष्ट्रीय मुख्य प्रशासिका बनल्या.

मुंबई घाटकोपरच्या इंदिरा दीदी (नलिनी दीदींच्या बहीण) रतनमोहिनी दादींनी दिलेल्या संगोपनाचं असं वर्णन करतात, 'दादी रतनमोहिनीजी तर आमच्या परिवाराच्या जणु कुलदेवीच होत्या! आमचं कुटुंब मोठं होतं, दादींनीच आमच्या परिवाराला सतत मार्गदर्शन करुन सांभाळलं. आरंभी मुम्बईत सायन व वाटरलू मेन्शन हीच दोन सेवाकेंद्रे होती. वाटरलू मेन्शन सेंटरच्या रतनमोहिनी दादीजी टीचर होत्या. वाटरलु मेन्शन सेंटर कोलाबा पासून जवळ होतं, त्या सेंटरवर दादी कोलाबाहून येऊन सेवा करत. तिथेच आम्ही रतनमोहिनी दादींच्या सम्पर्कात आलो. दादीच आमच्या कुटुंबाच्या प्रत्येक समस्येचं निदान करत. नलिनी दीदी आणि माझा दादींशी खूप घनिष्ट संबंध होता, पुरुषार्थाच्या गोष्टी, स्वउन्नतीचा चार्ट आम्ही दोघी बहिणी रतनमोहिनी दादींनाच देत असू. दादींनीच आम्हाला भाषण करायला शिकवलं. ब्रह्माबाबा व जगदम्बा मातेश्वरीजीं नंतर आमच्या परिवाराची दृष्टी (नजर) रतनमोहिनी दादीं शिवाय इतर कुणांमधे कधी गेली नाही. दादींनीच आम्हाला शिक्षिका, मोठी बहीण, सखी व मातपित्याच्या रुपात संगोपन दिले. दादींची एक खास खुबी होती ती म्हणजे प्रत्येकाचा विकास करायचा! दादी प्रत्येकातला गुण शोधून काढत आणि त्या गुणाच्या आधाराने पुढे नेत. दादींचे दुसरे वैशिष्ट्य होते एखादी किती ही फेल केस असो, तरी त्याला ठीक करुनच दम घेत. व्यक्ति घसरुन चिखलात फसते व त्याची फक्त शेंडीच वर दिसत असते, अशा परिस्थितीत दादी प्रयत्नांची पराकाष्ठा करुन, ज्ञानमार्गात पांच विकारांच्या दलदलीत (चिखलात) कुणी फसला, तर असंच सोडून न देता, अंतिम क्षणापर्यंत शेंडी पकडून परिस्थितीतून बाहेर काढत आणि माया अजगराच्या विळख्यातून सोडवून, त्यांना स्वतःच्या पायावर उभं करण्या इतकी हिम्मत देत, दादी कधीही हार मानत नसत.

मधुबनच्या लीला दीदी रतनमोहिनी दादींची वैशिष्टये सांगतात, 'नम्रतेच्या मूर्ति दादी रतनमोहिनीजी मोठ्यां समोर छोट्या बनून, विनम्र होऊन राहिल्या. दादी जरी विश्वव्यापी ब्रह्माकुमारी संस्थेच्या मुख्य संचालिका बनल्या, तरीही 'मी संस्थेची हेड आहे' हा भाव दादींमध्ये कधीच आला नाही. टीचर्स समस्या घेऊन येत, दादी सर्वांचं ऐकायच्या आणि निवारणही करायच्या. दादींनी टीचर्स बहिणींना कधीही नाराज किंवा निराश करुन पाठवलं नाही. टीचर्स सदैव हेच वर्णन करतात दादींनी आमचं जीवन कसं घडवलं! दादीजी म्हणत कोणतीही गोष्ट मनात ठेवून बसू नका, पुढे चालत रहा. दादींपाशी सेवाकेंद्राच्या बऱ्याच गोष्टी येत असत, रतनमोहिनी दादीजी सर्व समाचार प्रकाशमणी दादींना किंवा जानकी दादींना सांगून हल्क्या राहत. प्रकाशमणी दादींचा किंवा जानकी दादींचा सेवेचा कार्यक्रम अचानक एखाद्या कारणाने रद्द झाला तर रतनमोहिनी दादी तत्काल एवरेडी बनून जात. दादी रतनमोहिनी जी खूप अथक होत्या. एकदा सेवा करुन दादी रात्री १२ वाजता परतल्या, बाहेर

दादींना भेटण्यासाठी लोकं वाट पाहत होती. मी म्हणाले, 'दादी रात्रीचे १२ वाजतायेत. दादी म्हणाल्या घड्याळ नको पाहू, सेवा पहा.' दादींचं स्वतःवर खूप नियंत्रण होतं, भोजनात दोन फूलके खायचे असतील तर दोनच फूलके घेत. दादी मालक बनून तन व मनाला चालवत. दादी कुणालाही भेटत तेव्हा आदि-मध्य-अंता सहित पूर्ण समाचार ऐकत आणि ज्ञान तर असं विस्तार पूर्वक देत, जणु सत्यनारायणाची कथाच सांगत आहेत!'

रतनमोहिनी दादींच्या कॉटेजचे रवी भाई रतनमोहिनी दादींचे वैशिष्ट्य सांगतात, 'देह त्यागायच्या सहा महिन्यापूर्वी दादींना अहमदाबाद हॉस्पिटलमधे एडमिट केलं होतं. हॉस्पिटलमधे वार्ड बॉय असो किंवा कुणी सफाई कर्मचारी, जो कोणी येई, त्यांना दादी विचारत, 'तुमची तब्बेत कशी आहे, जेवलात का?' ते आश्चर्य करत ह्या कोण महान व्यक्ती आहेत, ज्या इतक्या प्रेमाने विचारपूस करतायंत, आम्हाला तर कुणी सुद्धा विचारत नाही.' मी उत्सुकतेपोटी दादींना म्हणालो, 'दादीजी, आपण केरकचरा साफ करणाऱ्या, फरशी पुसणाऱ्या कर्मचाऱ्यांची विचारपूस करता, ह्यात कोणतं रहस्य दडलयं?' दादीजी म्हणाल्या, 'आपल्याला ह्यांना देखील संतुष्ट करुन, त्यांच्या शुभेच्छा घ्यायच्या आहेत. सर्वांकडून संतुष्टतेचं सर्टीफिकेट घ्यायचं आहे, म्हणून!' जर आपण एखाद्याचा वाईट संस्कार पाहिला तर त्या पासून दूर जातो. त्याची विचारपूस करत नाहीं. दादीजी म्हणत, 'कुणी कितीही असंतुष्ट असला तरी आपल्याला आशीर्वाद द्यायचे आहेत, शुभेच्छा घ्यायच्या आहेत.'

दादी रतनमोहिनीजी तर उदारता व परोपकाराच्या देवीच होत्या. दयाळू-मायाळू दादीजी गहन साधना, महीन तीव्र पुरुषार्थ करुन शिवपित्या समान मास्टर विश्वकल्याणकारी बनल्या होत्या. दादी श्वासोच्छवास एक प्रभु पित्याच्या आठवणीत मग्न होऊन, सर्वां प्रति निरंतर शुभचिंतन करत. अंतापर्यंत दादींनी आदर्श विद्यार्थी बनून निरंतर आत्मिक अभ्यास करायची सर्वांना प्रेरणा देत राहिल्या. अखेरच्या दिवसात दादींनी सुख-दुःख, जय-पराजय, निंदा-स्तुति इत्यादी मधे समान, एकरस अचल-अडोल कर्मातीत अवस्था प्राप्त केली होती. दादीजी अखण्ड मौन अवस्थेत चैतन्य मूर्ति बनून, असीम ईश्वरी प्रेमयुक्त, शुभभावना-शुभकामनांनी युक्त शुभेच्छा सर्वांना द्यायच्या अन् प्रत्येकाची झोळी आत्मिक सुख व मनःशांतींच्या माणिक मोतींनी भरायच्या.

आयुष्याचा प्रत्येक श्वास, संकल्प विश्वसेवेत सफल करत-करत, ८ एप्रिल २०२५ रोजी दादीजी, नश्वर देह त्यागून अव्यक्तवतनवासी फरिश्ता बनल्या, आजही दादी रतनमोहिनी सर्वांच्या मन मंदिरात प्रेम व दयेची देवी बनून अमर आहेत अन् अमर राहणार..! अशा अतिप्रिय, स्नेहवत्सल दादींना प्रथम पुण्यतिथीच्या निमित्ताने अमुचे शत् शत् नमन व अभिवादन..

***

---

(पृष्ठ क्र. ६ वरून)

आंतरिक वैराग्य दिवसागणिक अजूनच शक्तिशाली होत गेले त्यामुळे अंतर्मुखी राहणे, मौन तपस्या करणे, द्वेषा पासून अलिप्त असणे हे मला खूप प्रिय वाटते. काही वर्षापूर्वी आलेल्या, करोना महामारीनेही, आपल्याला तपस्या करण्याची, अध्ययन करण्याची, मानस सेवा करण्याची सुवर्ण संधी दिली.

मला साकार बाबांसारखे संपूर्ण संपन्न बनायचेच आहे. ह्यासाठी बाबांचे सदोदित स्मरण करणे, त्यांच्यावर संपूर्ण समर्पित होणे आणि यज्ञाप्रति पूर्ण निष्ठा ठेवणे हीच माझी आंतरिक तपस्या आहे. आयुष्याच्या शेवटच्या घटकेपर्यंत, कुठल्याही परिस्थितीत सेवा करत राहायचे आहे. हेच साधनेचे फलित आहे.

कवयित्री पद्मा गोळ्यांची 'लेणी' नावाची एक सुंदर कविता आहे. त्या म्हणतात 'माणसाच्या मनात काही सुंदर लेणी असतात.' आपल्या सगळ्यांच्या मनांत प्रिय शिवपित्याची लेणी अशी काही कोरली जावी जेणेकरून शेवटच्या श्वासाच्या वेळी फक्त तोच आठवावा. समर्थ रामदासांच्या ओव्यांनी समारोप करूया.

**सखा मानावा भगवंत**
**माता-पिता गणगोत**
**लक्ष्मी विद्या धन-वित्त**
**सकळ परमात्मा**

**(शब्दांकन - ब्र.कु. मधुरा, ठाणे)**

***

# परमात्म्याचा सत्य परिचय

ब्र.कु. रामकृष्ण, वाशिम

शिव भगवानुवाच - ज्याप्रमाणे स्वतःचा लौकिक परिचय स्वतःच किंवा लौकिक मात-पित्याकडून दिल्याशिवाय या जगात कुणाला ओळखता येणार नाही, त्याचप्रमाणे सर्वांचा पारलौकिक मात-पिता असलेल्या परमात्म्याचा परिचय स्वतः परमात्म्यानेच दिल्याशिवाय होत नाही. तो सर्वोच्च (स्वयंभू) असून त्याचा कोणीही मात-पिता नाही. पाच आंधळे व एक हत्ती या गोष्टीतील आंधळ्याप्रमाणे स्वतःचेच खरे असे म्हणून धर्माधर्मामध्ये वाद होऊन हिंसात्मक घटना घडत आहेत. धर्मात्म्यांचे किंवा माणसांचे परमात्म्याविषयीचे हे अज्ञान पांच आंधळ्यांनी केलेल्या हत्तीच्या वर्णनासारखे आहे.

सत्य ज्ञानाअभावी धर्मात्म्यांचे किंवा माणसांचे परमात्म्याबाबत असलेल्या परस्पर विरोधी मतांद्वारे अज्ञानच दिसून येते. कोणी म्हणतो १) निसर्ग (प्रकृती) परमात्मा आहे. तर दुसरा कोणी म्हणतो २) श्रीकृष्ण, श्रीराम, बुद्ध, येशू ख्रिस्त इ. परमात्म्याचे अवतार होत. ३) आत्मा आणि परमात्मा एकच आहेत. ४) ब्रह्म म्हणजेच परमात्मा होय. ५) मीच परमात्मा आहे. (शिवोऽहम) ६) परमात्मा सर्वव्यापी आहे. ७) परमात्म्याला कोणते रुपच नाही. ८) समस्त प्राणीमात्र ही परमात्म्याची विविध रुपे होत. ९) परमात्म्याचे वास्तव्य स्वर्गात असते. परमात्म्याने स्वतः अवतरीत होऊन सत्य परिचय दिल्याशिवाय साधकाला परमात्म्याशी योगयुक्त किंवा त्याचे स्मृतीत राहणे शक्य होणार नाही. सत्य परिचयामुळेच साधकाचे मन एकाग्र होईल, भटकणार नाही.

सर्वसाधारण मान्यतेनुसार परमात्म्याची ओळख पाच बाबींच्या आधारे होते - १) ज्याला सर्व धर्मांचे लोक मान्य करतात व जो सर्वधर्मीयांचा मालक, परमपिता, परमशिक्षक, परमसद्गुरु आहे. २) जो सर्वोच्च सर्वश्रेष्ठ, सर्वोत्तम आहे. तोच सर्वांचा परमपिता, परमशिक्षक, परमसद्गुरु व परमरक्षक आहे. ३) जो सर्वांहून वेगळा आहे. परमात्मा जन्म-मरण, सुख-दुःख, पाप-पुण्य व कर्मफळ या सर्वांहून वेगळा आहे तसेच प्राकृतिक बंधनापासून मुक्त आहे. म्हणूनच तो सर्वमान्य आहे. ४) जो सर्वज्ञ आहे. अर्थात सर्वकाही जाणणारा आहे. म्हणूनच ईश्वराला स्मरून एखाद्या न समजून येणाऱ्या बाबीत म्हटले जाते - देव जाणे, खुदा जाणे, वा भगवान जाणे ५) जो सर्व सद्गुण व शक्तीचे सागर असून त्यांचा दाता आहे. परमात्मा कोणाकडून काहीही न घेता उलट सागर वा सूर्याप्रमाणे गुण व शक्ती देतच राहतो. या पाचही बाबीवरून सिद्ध होते - कोणीही देहधारी माणूस परमात्मा होऊ शकणार नाही.

स्वतः निराकार परमात्मा प्रजापिता ब्रह्माचे तनामध्ये अवतरीत होऊन जो सत्य परिचय देतात तोच येथे विदित केला आहे. परमात्मा रुपाने निराकार आहे अर्थात त्याला मानवाप्रमाणे वा सूक्ष्म देवतांप्रमाणे स्थूल वा सूक्ष्म शारीरिक आकार नाही. त्याचे स्वरुप सूक्ष्म असून ज्योतीबिंदू आहे. निराकार अर्थात अशरीरी परमात्म्याचे नाव **'शिव'** आहे. शिव अर्थात कल्याणकारी, बिंदूरुप परमात्मा नावापासून वेगळा नसून त्याचे नाव देहधाऱ्यापेक्षा आगळे आहे. परमात्म्याचे नांव शाश्वत, स्वयंकथीत असून ते दिव्य गूण व कर्तव्ये यावर आधारलेले आहे. त्याला वेगवेगळ्या देशात, धर्मात व भाषेत वेगवेगळ्या नांवाने स्मरण्यात येते. उदा. भारतात त्याला अमरनाथ, रामेश्वर, विश्वनाथ, सोमनाथ इ., नेपाळमध्ये पशुपतीनाथ, अरबदेशात मुस्लिम लोक 'मक्केश्वर' म्हणून ओळखतात. जपानमध्ये 'चिनकॉनसेकी' अर्थात शांतीदाता म्हणून ओळखतात. इटली देशात

रोममध्ये रोमन कॅथॉलिक ख्रिस्ती लोक 'प्रियपस' म्हणतात. यहुदी लोक शिवाला 'जेहोवा' म्हणतात. भारतात शिवाची लाखो मंदिरे आहेत. परमात्मा ज्योतीस्वरुप आहे. शिवलिंग हे परमात्म्याच्याच ज्योतीस्वरुपाचे स्मृतिचिन्ह आहे. येथे लिंग या शब्दाचा अर्थ प्रतीक, प्रतिमा किंवा चिन्ह असा आहे. एकंदरीत सर्व धर्म स्थापकांनी एक निराकार ज्योतीस्वरुपाचाच महिमा केला आहे.

परमात्म्याचे निवासस्थान आत्म्यांच्या निवासस्थानाप्रमाणेच ब्रह्मलोक आहे. कित्येक लोक, सोनेरी लाल अखंड ज्योती ब्रह्मतत्वालाच परमात्मा समजतात. ज्याप्रमाणे आत्मा व शरीर वेगवेगळे आहेत त्याचप्रमाणे शिवपरमात्मा व ब्रह्मतत्व वेगवेगळे आहेत. कलियुग संपण्यापूर्वी काही वर्षे अगोदर अर्थात १९३६ मध्ये वृद्ध दादा लेखराजांच्या देहात परकाया प्रवेश करुन अवतरीत होऊन परमात्म्याने आपला परिचय खालीलप्रमाणे दिला आहे – निजानंद स्वरुपम्, शिवोऽहम् शिवोऽहम् – ज्ञान स्वरुपम्, शिवोऽहम् शिवोऽहम् – प्रकाश स्वरुपम् शिवोऽहम् शिवोऽहम्. प्रजापिता ब्रह्माच्या माध्यमातून सहज ज्ञान व सहज राजयोग शिकविला जातो. सर्व शास्त्रांचे सार– आत्मा व परमात्मा दोन्हीही अदृश्य आहेत. माघ महिन्याच्या चर्तुदर्शीस (चौदाव्या घोर अंधकाराच्या दिवशी) महाशिवरात्री साजरी केली जाते. शिवमंदिरात शिवाची (शिवलिंग) देहधारी मूर्ती नसते. कारण शिवलिंग हे शिवपरमात्म्याचे प्रतीक आहे. शालिग्राम हे आत्म्याचे प्रतीक आहे. शिवलिंगावर वस्त्र ठेवत नाहीत. कारण शिवपरमात्म्याला स्वतःचे शरीर (वस्त्र) नसते. परमात्मा हा सर्व मनुष्यांत्म्यांचा माता–पिता आहे. त्याचा कोणी माता–पिता नाही. तो गर्भाद्वारे जन्म घेत नाही, तर ब्रह्माच्या शरीरात परकाया प्रवेश करणे हाच त्याचा दिव्य जन्म व अतवरण होय.

परमात्म्याचा साररुपात परिचय – दिव्यनांव - शिव, दिव्यरूप – ज्योतीबिंदू, दिव्यधाम – परमधाम, दिव्य कर्तव्य परमात्म्याचे दिव्य अवतरण झाल्याने परमात्मा पतीत मनुष्य आत्म्यांना पावन बनविण्याचे दिव्य कर्तव्य करतो. ब्रह्माद्वारे सत्ययुगी राजधानीची स्थापना, शंकराद्वारे कलियुगी अधर्माचा विनाश, विष्णूद्वारे सत्ययुगी राज्याचे संगोपन करवितो. अवतरणाचा कालावधी–कल्पाचा आदि व कल्पाचा अंत यामधील पुरुषोत्तम संगम युगात अवतरीत होतात. दिव्यसंबंध – विश्वातील सर्व आत्म्यांचे परमपिता दिव्य महिमा परमशिक्षक व परमसद्गुरू. इतकेच नव्हे तर आपण सर्व परमात्म्याशी सर्व संबंध जोडू शकतो. परमात्म्याचा महिमा व दिव्य गुण – अगाध, सदासत्य, सदाकल्याणकारी, सदापावन, पृथ्वीचा कागद केला, जंगलाची लेखणी केली, सागराची शाई केली व जगदंबा सरस्वतीला लिहावयास लावले तरी महिमा संपणार नाही. तो रुपाने बिंदू परंतु गुणाने सिंधू आहे. दिव्यदृष्टी व दिव्यबुद्धीचा दाता आहे, तो भक्तांचा रक्षक आहे, दुःखहर्ता – सुखःकर्ता आहे, गती–सदगती दाता आहे, पतितपावन आहे. परमपिता, परमशिक्षक व परमसद्गुरु आहे, कर्माची गुह्यगती जाणणारा आहे, मनुष्य सृष्टीरुपी वृक्षाचा बीजरूप आहे, सृष्टीच्या आदि–मध्य–अंताचा ज्ञाता आहे, सत–चित–आनंद स्वरुप आहे, नरापासून श्रीनारायण व नारीपासून श्री लक्ष्मी बनविणारा आहे. तो अजन्मा असल्याने मनुष्यांत्म्यां–प्रमाणे सत्व, रज व तम या गुणांच्या चक्रात येत नाही. परमात्मा निर्गुण आहे असे सुद्धा म्हणतात. परंतु तो तर सर्व गुणांचा सागर आहे. निर्गुण म्हणजे तो मनुष्यात्म्यांप्रमाणे सत्व, रज व तम या गुणांमध्ये येत नाही. परमात्मा आपल्या ब्रह्मांवत्सांना २१ जन्मांचा सुख–शांती व पवित्रतेचा अलौकिक वारसा हक्क प्रदान करतो. परमात्मा परम–शिक्षकाच्या नात्याने तो प्रतिदिन ज्ञान मुरलीद्वारे आपल्या आत्मिक विद्यार्थ्यांना देवतांची डिग्री प्राप्त करवून देण्यासाठी अमूल्य असे ज्ञान ऐकवितो. परमात्मा परम सद्गुरुच्या नात्याने आपल्या सदशिष्यांची आत्मिक स्थिती श्रेष्ठ बनवितो. त्यासाठी तो वेळोवेळी मार्गदर्शनही करतो. याप्रमाणे परमेश्वराशी सर्व संबंध जोडल्यास आपण त्याचेशी निरंतर योगयुक्त होऊन पुरुषार्थ केल्यास सत्ययुगात श्रेष्ठ पद (देवतापद) प्राप्त करु शकतो.

मनुष्य सृष्टीरुपी अनादि, अविनाशी नाटकाचे सुरुवातीस सत्ययुगात त्रेतायुगात सतधर्माचे (पवित्र धर्माचे) राज्य असते व नंतरचे द्वापर व कलियुगात रजो, तमो मानव पतित बनतो. गुणाच्या प्रभावामुळे याच काळात धर्मस्थापकांद्वारे अनेक धर्म, पंथ, मठ, संस्था, मार्ग इत्यादि काळाच्या ओघात स्थापित होतात. सर्व धर्मीय मनुष्यात्मे एकाच निराकार त्रिमूर्ती परमपिता परमात्म्याची संतान असून परमधाम निवासी आहेत. त्यांचे स्वरुप, स्वधर्म, स्वदेश, धाम एकच आहे. कलियुगाचा अंत व सत्ययुगाचा

प्रारंभ यामधील पुरुषोत्तम संगम युगात शिव परमात्म्याने प्रजापिता ब्रह्मांद्वारे दिलेले ईश्वरी ज्ञान-योगाचे शिक्षण सर्व धर्मीय मनुष्यात्म्यांसाठी कल्याणकारी असून ते आपापले पुरुषार्थानुसार आपापले धर्मात श्रेष्ठ पद प्राप्त करु शकतात. शिव परमात्मा मनुष्य सृष्टीचे चैतन्य बीजरुप असून सदा पावन आहे. म्हणून या सृष्टीवरील त्याचे आगमनांनंतर नवसृष्टी वृक्ष म्हणजे नव्या सत्ययुगी सृष्टीला प्रारंभ होतो. याप्रमाणे हे सृष्टीचक्र प्रत्येक कल्पात अचूक पुनरावृत्त होत राहते. म्हणूनच या सृष्टीचा अंत व प्रारंभ सांगितला जात नाही. हे सृष्टीचक्र अव्याहत चालू राहते.

काही लोक म्हणतात आम्हांला ईश्वर दाखवा. परंतु ईश्वर काही पहायची वस्तू नाही तर त्याचा अनुभव मात्र घेता येतो. स्वतःला चैतन्य आत्मा समजून त्या परमचैतन्य परमात्म्याला जाणता येते, अनुभवता येते. ज्याप्रमाणे आत्म्याला आपण पाहू शकत नाही परंतु त्याला बुद्धीद्वारे जाणता येते, अनुभवता येते. त्याप्रमाणे परमेश्वराला जाणण्यासाठी त्याने दिलेले ज्ञान आपण आपल्या बुद्धिच्या कसोटीवर घासून पाहू शकतो. याबाबत जाणून घ्यायचे असेल तर जवळच्या ब्रह्माकुमारी सेवाकेंद्रावर अवश्य जावे ही कळकळीची विनंती.

***

---

(पृष्ठ क्र. १० वरून)

नाही. हे काम झालच पाहिजे बघा. कसं उरकेल ते सांगा बरं! लगेच एक बाई मिळाली कामाला. माझा हा अनुभवच म्हणावा लागेल की जेव्हा जेव्हा मी बाबांना मनापासून बोलवते तेव्हा कुणी न कुणी येतोच मदतीला. भक्तिमार्गात जनाबाईंचे अभंग ऐकले होते. त्यातले काही आजही लक्षात आहेत.

**झाडलोट करी जनी। केर भरी चक्रपाणी। पाटी घेऊनिया शिरी। नेऊनिया टाकी दूरी। ऐसा भक्तिसी भुलला। नीच कामें करू लागला। जनी म्हणे विठोबाला। काय उतराई होऊ तुला।।**

तसेच पूर्वी मी फार तापट होते. लगेच राग यायचा पण ह्या ज्ञानाने मी आता शांत झालेय. मनांत कुणाच्या व्यर्थ गोष्टी मी ठेवत नाही. जे काय करायचं ते मी आणि बाबा एवढंच माझं जग आहे. कुणाशी परचिंतन करत नाही. तसेच त्यांना बाबांच्या गोष्टी ऐकवते. ऐकले तर ठीक नाही तर मी आणि माझे बाबा. वाद न घालता मी मग गप्प असते. मला फारसं कुणी डिवचत नाही.

मी सतत बाबांच्या आठवणीत राहण्याचा प्रयत्न करते. शिवबाबा आमचा बडा बडा ब्रह्माकुमारींनी घातला येढा (वेढा) ... अशी काहीबाही स्वरचित गाणी गात गात मी शेतातली कामं करते. लहान मुलांशी खेळत फुगडी घालते, नाचते. बाबांची गाणी गाते. भाकरी करताना ही गोल गोल फिरत नाचत त्या थापते. सगळ्या भाकरी असं चक्र (सृष्टी) चालवत मस्त करते. मला जास्त काही गाणी रचता येत नाहीत, पण तरी मी काहीही करून बाबांच नाव घेत आपली कामं पूर्ण करते.

अशाप्रकारे ईश्वरी ज्ञानाच्या आधारे माझं जीवन फार फार मस्त चाललय. लई मस्त वाटत बाबा आणि हे ज्ञान. वाह रे मैं, वाह रे मेरा बाबा, प्यारा बाबा, मीठा बाबा शुक्रिया बाबा!

***

---

(पृष्ठ क्र. १४ वरून)

की राहिलेले पैसे जमा करून दे. कधी म्हणत बाबांच्या भंडारीत तर सर्व काही मिळते चल मी तुझ्यासोबत येते आणि तुला उपलब्ध करून देते. दादी अशा पद्धतीने एक एक रुपयाचा हिशोब ठेवायच्या आणि सफल करायच्या.

अशा महान वैशिष्ट्यांनी संपन्न दादी होत्या. दादीजींचे सान्निध्य चंदनासमान मांगल्य, पावित्र्याचा सुगंध देणारी कुपी आहे. त्यातून सुवास दरवळतच राहतो.

***

---

मला माझ्या बागेत जर जास्त फुले हवी असतील, तर मला त्यांची जास्त प्रमाणात लागवड करावी लागेल, तद्वत मला जर माझ्या आयुष्यात जास्त प्रेम हवे असेल, तर ते मी इतरांना जास्त प्रमाणावर देण्यास सुरुवात करायला हवे, तरच ते माझ्याकडे जास्त पटीने परत येऊ शकेल.

आपल्याला जे हवे असते ते मिळवण्याचा एकमेव मार्ग हाच आहे की जेवढे द्याल त्याच्या अनेक पटीने परत मिळेल.

ब्रह्मावत्सांकरिता



# ज्ञानाची उकल दादी जानकीजींसोबत

**संकलक – ब्र.कु. नेहा, ठाणे**

**(भाग–१)**

**प्रश्न :** दादी तुम्हाला ज्ञानात अनेक वर्षे झाली आहेत. या सभेमधे काही ३० वर्षे तर काही ४० वर्षे ज्ञानात असलेले आले आहेत. काहींना तर एक दीड वर्ष झाले आहे. सगळ्यांना पुरुषार्थ करायला हवा. पुरुषार्थ केला नाही तर प्रालब्ध बनणार नाही. पण आज सकाळी तुम्ही म्हणालात, पुरुषार्थ करणे बंद करा. हे कसे काय?

**उत्तर :** एका सेकंदात शांतीमधे जायचं, अशांत होण्याचा स्वभाव बदलायचा. मनुष्याला जे हवं ते मिळवणे हाच पुरुषार्थ आहे नां! साधी गोष्ट आहे. समजतच नाही एवढी मोठी गोष्ट एक सेकंद शांत झाल्यामुळे कशी सहज सुटली. सेकंदाची गोष्ट आहे. दुःखी अशांत होण्यासाठी किती वेळ लागतो. जो दुःखी होतो नां, त्याला सुखी होणे खूप कठीण असते. दुःख विसरतच नाहीत. दुःख मनात एवढं भरलेलं असत की पुढच सगळं जीवन दुःखी करून टाकतात. याच्यावर परमात्मा एक छान युक्ती शिकवतो. तो सांगतो, 'हे आत्मा, तू शांत आहेसंच'. हे समजावून घेतलं तर शांती मिळते आणि त्याद्वारे शक्ती पण मिळते. याच्यासाठी फार थोडा वेळ लागतो.

आमच्यासाठी एक चांगली गोष्ट होती की पुरुषार्थ करण्यासाठी आमच्याकडे वेळ होता. आमचं सगळं जीवनच पुरुषार्थी होतं. पुरुषार्थ म्हणजे जे परमात्म्यानी शिकवलंय ते आचरणात आणणे. ना वेळ व्यर्थ घालवायचा ना व्यर्थ गोष्टींचा विचार करण्यात, बोलण्यात घालवायचा आणि ना निरर्थक संग करायचा. असं पुरुषार्थी जीवन असेल तर त्याचं फळ नक्की मिळतंच. बाबांनी एकदा आम्हाला सांगितलं होत. खूप फळं नाही खाऊ शकत तर त्यांना ज्यूस काढून द्या. आणि ते सुद्धा पचायला जड जात असेल तर दिवसभर थोडा थोडा देत रहा. त्यामुळे त्यांना ताकद मिळण्याची जाणीव होईल. त्यांनी मागितलं नाही तरी वृत्ती, आध्यात्मिक प्रकंपनांद्वारे त्या कमजोर मनुष्यांना देत रहा.

एकदा तरी ज्ञानसरोवरला जाऊन तिथलं वातावरण नक्की बघा असं शांत शक्तीशाली वातावरण आहे की व्यर्थ संकल्प येतच नाहीत आणि तरीही आले तर काय म्हणायचं? हा काय पुरुषार्थ झाला? इतक्या सुंदर शक्तीशाली वायुमण्डळामधे प्राप्ती करण्याचं भाग्य मिळाले आहे. मग त्यामधे भूतकाळाच्या आठवणी, भविष्याच्या गोष्टी, याच्या त्याच्या गोष्टींमधे वेळ घालवला तर प्राप्ती कशी होईल? नेहमी वर्तमान काळामधल्या गोष्टींबद्दल बोला. भूतकाळाच्या आठवणींनी दुःख होतं तर भविष्याच्या चिंतेनी काही पुरुषार्थ करू शकत नाही. वर्तमानमधे जे तुमच्या समोर आले आहे. त्या संधीचा लाभ घ्या आणि भाग्य बनवा. अमृतवेळेला झोपण्याच्या ऐवजी बाबांच्या आठवणीत उठून बसा. हा सहज पुरुषार्थ आहे. मनासाठी आणि आरोग्यासाठी जे चांगल नाही ते करू नका.

डॉक्टर पेशंटला सांगतात, तुला काय औषध द्यायचं त्याचा विचार मी करेन. तू नको करूस. तू फक्त सांगितलेल्या वेळेवर प्रेमाने गोळ्या व इंजेक्शन घे. तसंच परमात्मा जाणतो माझ्या मुलाला मेहनत पडू नये. तो प्रत्येक मुलाचा धर्म, जाती, वर्ण जाणतो. आई–बाबा आपल्या मुलाला चांगले जाणत असतात. त्याप्रमाणे परमात्मा जाणतो. माझ्या मुलाचे कसे हाल झाले आहेत. तो जे सांगतोय त्याच्यावर बुद्धि चालवू नका. बरेच आहेत जे परमात्मा म्हणतोय तसं नाही करत. आपली बुद्धि चालवतात त्यामुळे पुरुषार्थांमधे मेहनत वाटते. बुद्धिची स्थिरता असेल तर पुरुषार्थामधे मेहनत होत नाही आणि संकल्प शुद्ध ठेवलेत तर मन शांत राहील आणि आनंद पण मिळेल. मग शक्ती पण येईल. हाच सहज सोपा विधी आहे. चांगल्या पुरुषार्थासाठी फक्त बुद्धी फ्री ठेवायची. परमात्मा जे सांगतोय ते प्रेमानी

ऐकायचं. ते बोल हृदयात जातात. कान निमित्त असतात पण त्या बोलाने निर्बल आत्म्याला बळ मिळत राहतं.

कोण देतंय, काय देतंय याचं पण भान नाही. बस फक्त त्याची दृष्टि, आत्म्यासाठी जे कल्याणकारी आहे, प्रेम आहे ते माझ्यावर काम करतयं. या भावनेत रहा. मग बघा कसा पुरुषार्थ होतो.

**प्रश्न** : संगमयुगामधे बाबांची संतान बनल्यानंतर एखाद्याने खूप चुका केल्या आहेत किंवा खूप वेळ फुकट घालवला आहे. परंतु त्याला ते सगळं विसरून पुढे जायचं आहे. तर जे होऊन गेलं आहे ते कसं विसरायचं आणि पुढे जायचं?

**उत्तर** : ज्ञानी आत्म्यावर कर्माचं ओझं जास्त चढतं. जाणत असून चुकीचे कर्म करू नये! अज्ञानी आत्म्याला शिक्षा कमी होते असं बाबा सांगायचे, अज्ञानी माणसापेक्षा ज्ञानी माणसाकडून चूक झाली तर ती अधिक गंभीर आहे. ही समज हवी. बऱ्याच वेळा बाबा मुरलीमधे सांगत असतात आपल्याकडून काही चूक झाली तर बाबांना सांगा माझ्याकडून चूक झाली. गुलजार दादी म्हणतात, डबल विदेशींचा एक चांगला गुण म्हणजे ते लगेच सांगतात काही लपवून ठेवत नाहीत. बाबांना लगेच सांगितलं तर अर्धी चूक माफ होते. बाबा पण बघतात, मूल खरं बोलतंय काही लपवत नाही. आपली चूक झाली आहे हे त्याला समजतंय. परत नाही करणार. बाबांची मुलं म्हणतात, बाबा, मी परत चूक नाही करणार. अशी खोलवर जाणीव असावी आणि त्याच्याच बरोबर कुणाचा संग (सोबत) करावा याची जाण हवी.

पुरुषार्थात आळस, मनमौजीपणा नको. बाबांशी सच्चा होऊन रहायला हवं. कधीही खोटं बोलायचं नाही. काहीचूक झाली तर लपवून ठेवण्याची सवय अतिशय घातक आहे. प्रामाणिकपणे बाबांना सांगायला हवं. अशा खऱ्या जाणीवेनी क्षमा मागितली की बाबांना सुद्धा दया येते. बाबांच्या प्रेमाने शक्ती येते, पुरुषार्थ करण्याची हिंमत येते. त्याचबरोबर ब्राह्मण परिवाराचे प्रेम मिळते. परिवारामधे एकत्र आल्यामुळे शक्ती मिळते. कुसंगापासून बचाव होतो. मग लवकरच परिवर्तन होते. एखाद्याला परिवर्तन होण्यासाठी वेळ लागतो. कारण पुरुषार्थाची ओढ नसते. स्वतःवर लक्ष असायला हवे ही वेळ गेली तर काही कामाची नाही. ना बाबांची मदत मिळेल ना परिवाराचा स्नेह मिळेल. खऱ्या पुरुषार्थाची ओढ असेल तर आधी होऊन गेलेल्या गोष्टी विसरून जातात. आपले बाबा असा विसर पाडतात ज्याद्वारे चुकून सुद्धा आठवण होत नाही. जर कोणी परत आठवण करून दिलीच तर आठवण करून देणारा चुकीचा आहे असे दिसून येईल. एवढी तळमळ हवी. बाबांनी सांगितलंय कोणी चूक केली असेल तर आठवू नका आणि आठवण सुद्धा करून देऊ नका. बघू पण नका. शुभ भावना ठेऊन आपल्या वृत्तीने त्याला मदत करा. कुणाच्या चुका आठवणे माझ्यासाठी पाप आहे.

सकाळी ५ वाजता बाबा ज्ञान सांगायचे. एक दिवस बाबा म्हणाले, 'बच्ची रेकॉर्डवर गाणं लाव,' 'आ लौट के आजा मेरे गीत बुलाते है...' बाबांनी त्या दिवशी असे काही ज्ञान मुरलीद्वारे सांगितले की ते दृश्य पाहून काळीज द्रवलं. यज्ञामधून काही जण निघून गेले होते आणि परमात्मा म्हणतोय 'आ लौट के आजा मेरे मीत...' एवढे प्रेमाचा सागर बाबांना बघून हृदय द्रवणार नाही असा क्वचितच. मग परिवर्तन होणार नाही असा कोणी मीत असू शकत नाही. परमात्म्याचं प्रेम किती उच्च कोटीचं आहे, असं प्रेम कुठेच मिळणार नाही. पापी लोकांचं पाप नष्ट करतो. विस्मृत करून टाकतो आणि त्यांच्याकडून चांगली कर्मे करवून घेतो.

**प्रश्न** : दादी आत्ताच तुम्ही म्हणालात परिवर्तन करण्यासाठी (महसूसता की शक्ती) जाणीव आवश्यक आहे. बाबा पण बऱ्याच वेळा सांगतात जाणीव, परिवर्तनाचा पाया आहे. परंतु काही पुरुषार्थींना स्वतःविषयी खोटी संतुष्टता असते. माझा पुरुषार्थ चांगला चालला आहे. पुरुषार्थामधे मी पुढे चालले आहे असे वाटत असते. परंतु दुसऱ्या लोकांना हे जाणवत असतं की खरी परिस्थिती तशी नाही.

तर असं काय कारण आहे की स्वतःची स्थितीच जाणू शकत नाही. सत्यता जाणू शकत नाही की कदाचित मी पुढे नाही मागेच चाललो आहे किंवा जिथल्या तिथेच आहे. जाणीव असेल तर बदलेल नां परंतु जाणीवच रहात नाही याच कारण काय असू शकेल?

**उत्तर** : हे समजावून सांगायला आधी होऊन गेलेल्या बऱ्याच घटनांची मदत होते. कराचीची गोष्ट आहे. ध्यानी दादी सगळ्यांशी खूप गोड बोलायच्या कटू बोल त्यांच्या तोंडून कधी ऐकलेच नाहीत. यज्ञाच्या स्थापनेच्या काळात बाबांनी त्यांना हैद्राबाद येथे सेवेसाठी ठेवले होते. कुमारकादादी, मम्मा त्यांच्या नंतर आल्या. मम्मांना त्यांनी

स्वतःची मुलगीच मानलं होत. खूप चांगल्या होत्या. लौकिकमधे पण सगळ्यांशी गोड बोलायच्या. सगळ्यांना सुख द्यायच्या, मम्मांबरोबर एकदा आम्ही सगळे बसलो होतो. तेव्हा आम्ही म्हणालो ध्यानी दादी खूप चांगली आहे. हे ऐकून मम्मा चेहऱ्यावर आश्चर्य दाखवत म्हणाल्या असं! त्यांच्या चेहऱ्यावरुन असं वाटत होत की आम्ही जे म्हणतोय ते बरोबर नाही. मम्मा म्हणाल्या, ध्यानी दादींपेक्षा अमुक व्यक्ती चांगल्या आहेत. (ईशारा करून दाखवला) ह्या स्वतःला बदलण्यासाठी खूप मेहनत घेतायत. ध्यानी दादींना मेहनत घ्यायला लागत नाही कारण त्यांचा मूळ स्वभावच चांगला आहे. सगळेजण म्हणतात ध्यानी दादी खूप चांगल्या आहेत तर त्यांना पण वाटतय हो मी चांगली आहे. परंतु ह्या दिवस-रात्र स्वतःला बदलण्याच्या ध्येयाने मेहनत करत असतात. हे ऐकल्यावर आमचे डोळेच उघडले. मम्मा म्हणायच्या त्यांनी पहिल्यापासून चांगली कर्मे केली आहेत म्हणून त्यांचा स्वभाव गोड आहे. याच्याच बरोबर मम्मांचा ईश्वरी स्नेहमय स्वभाव आणि दादींचा स्वभाव याच्या मधलं अंतर पण लक्षात आलं.

या घटनेमुळे कुणाचा स्वभाव चांगला आहे, कुणाचा कोणता गुण चांगला आहे, कुणामधे कोणत्या गुणाची कमतरता आहे, त्याच्यावर त्याला पुरुषार्थ करायला हवा हे समजायला लागले. बाबांनी मम्मांना एक काम दिलं होतं. प्रत्येकाने स्वतः मधला गुण कोणता आणि अवगुण कोणता आहे हे लिहायचं. दिवसभर प्रत्येकाचा हाच विचार चालला होता. रात्र झाली मम्मा-बाबा बसले होते. भरलेल्या सभेसमोर प्रत्येक जण स्वतःमधला गुण, अवगुण सांगायला येऊ लागला. याचा फायदा झाला तसाच तोटासुद्धा झाला. ज्याचे जे अवगुण ऐकले ते दिसायला लागले. अवगुणच दिसायला लागले कारण गुण बघायची सवयच नव्हती. स्वतःला आतून स्वच्छ ठेवायला हवे हे आतून वाटायला हवे. अवगुण एक असतो परंतु गुण अनेक असतात. दुसऱ्यांचे अवगुण बघायचे नाहीत परंतु स्वतःमधले अवगुण काढून गुणवान बनायचं हे ध्येय असायला हवे.

भक्तीमार्गामध्ये म्हटलं आहे कुणाचेही अवगुण मनात ठेऊ नका. ते मनात ठेवल्याने आपण एकाग्रचित्त होऊ शकत नाही. ही जाणीव हवी. दुसऱ्याचे अवगुण मनात असतील तर कधीही शांतचित्त, हर्षितमुख होऊ शकत नाही. ही शिकवण आहे. म्हणून सत्वगुणी बनायचं. त्यामुळे चांगले गुण आपल्याकडे येतात. अवगुण दिसतच नाहीत. एकदा अव्यक्त बापदादा बोलले होते, चांगलं करत आहेस गुणवान बनण्याकडे लक्ष आहे. गुणदान करते आहेस. माझे मन हेलावून गेलं. बाबांच्या वरदानी वचनांनी खूप बळ मिळतं. बाबांच्या शक्तिनी माझ्यात गुण येवोत. कुणाचेही अवगुण बघायचे नाहीत. कुणाच्याही अवगुणांबद्दल विचार करणे, बोलणे पाप आहे. स्वतःला सत्वगुणी बनवून गुणवान व्हायचं आहे हा ध्यास हवा. आपल्या गुणांनी दुसऱ्याला गुप्त मदत करावी त्याच्यातील अवगुण काढून टाकण्यासाठी सहयोग द्यायला हवा. परिवाराचा सदस्य आहे नां, स्नेह आहे, हे गुप्तदान आहे.

खऱ्या पुरुषार्थामधे कुणाचेही अवगुण बघायचे नाहीत आणि वर्णनही करायचे नाही. स्वतःला गुणवान बनवायचे आहे. ही जाणीव असेल तर परिवर्तन नक्की होणारच.

**प्रश्न** : दादी, जर एखादी व्यक्ती चुका करत असेल तर आपली काय भावना असायला हवी हे तुम्ही सांगितलत परंतु त्या चुका करणाऱ्यास तुम्ही काय सल्ला द्याल की जेणेकरून त्याला स्वतःलाच जाणीव होईल की मी चूक केली आहे, म्हणून मी पुढे जात नाहीये. चुका करून सुद्धा स्वतःला बरोबर समजतो आहे.

**उत्तर** : त्या आत्म्याला जाणीव कशी करून देऊ याचं चिंतन करण्याची आवश्यकता नाही. यज्ञाच्या सुरुवातीला अशी वेळ होती की १०-१५ मिनिटं शांततेत बसवून समजावलं तरीही जाणीव होत होती. पण आता ती वेळ नाहीये. ईश्वरी स्नेह असेल तर समजावून सांगायला मदत होते. देवतांच्या मूर्तींच्या समोर जाऊन स्वतःच कबूल करतात की मी खोटं बोललो आहे, चोरी केली आहे. मला क्षमा करा. पण हेच साधु-संतांच्या समोर जाऊन कबूल नाही करणार. देवतांच्या समोर जाऊन बोलतात. म्हणजे जेवढी आपली पवित्रता असेल तेवढं समोरच्याला वाटेल की हा माझा सहयोगी आहे. जाणीव होऊन परिवर्तन होण्याची वेळ निघून गेली. आतमधे देहअभिमान भरला आहे. जिथून मान मिळतो तिथे संतुष्ट होतात. दिलेल्या मानामुळे हा देहअभिमान आहे हे समजतच नाही. अशा मंडळीना वाटते दादी मला समजून घेत नाहीत. उलट माझ्यावर नाराज असतात. अशा व्यक्तींना समजवायला जाणे म्हणजे वेळ वाया घालवणे. माझ्या शुद्ध

भावनांचा संकल्प त्यांच्यापर्यंत पोहचतच नाही. ते लोक समजतात, इतर समजतायत पण दादी समजून घेत नाहीत. मग याच्यासाठी मी काय बोलू? त्यांना समजावून सांगण्याचा विचारच करत नाही. वेळ येईल तेव्हा माझ्या भावनांचा स्वीकार होईल. नंतर २० वर्षांनी म्हणतील तुम्ही काय म्हणत होतात ते लक्षात आलं. याच्यासाठी धीर धरायला हवा. बाबा बसले आहेत, मी कोण समजावून सांगणारी? बाबांकडून त्याला बुद्धी मिळणार आहे. बाबाच दिव्यबुद्धि दाता आहेत नां! आपण पण त्यांच्याकडून घेतोय, प्रयत्न करायचा की यांचा योग बाबांशी लागावा. प्रेमानी, स्नेहानी शुभ भावना ठेवून आध्यात्मिक प्रकंपने देण्याचा प्रयत्न करत रहाणार. त्यांनी घडा उल्टा जरी नळाच्या खाली ठेवला तरी थंड राहील. घडा इथून दुसरीकडे गेला तर सुखून जाईल, तुटून जाईल. याच ब्राह्मण संगात राहू दे. कधीतरी नक्की बदलेल असे शुद्ध श्रेष्ठ संकल्प ठेवणे आपले कर्तव्य आहे. आपण कर्तव्य सोडायचे नाही.

**(क्रमशः)**

***

# तोताराम

एका माणसाला पोपट पाळण्याची भारी हौस होती. म्हणूनच त्याने एक पोपट विकत आणला आणि त्याचा तो खूप प्रेमाने सांभाळ करू लागला. त्याने त्याचे नाव 'तोताराम' असे ठेवले. हा तोताराम पोपट खूपच हुशार होता. त्याच्या समोर कुणी काहीही बोलले, तरी तो ते बोलणे अगदी तसेच बोलून दाखवत असे. तो तसे बोलायचा तर खरा. पण त्याला त्या बोलण्याचा अर्थ मात्र समजत नसे; पण पठ्ठ्या बोलण्यात मात्र हुशार होता. एक दिवस हा तोताराम नळावर बसून त्या नळाला वर खाली फिरवत होता, ज्यामुळे तोटी बंद चालू होऊन त्यातून पाणी गळत होते. पाणी उगाच वाया जाते आहे, हे बघून त्याचा मालक त्याला म्हणाला, 'तोताराम नळावर बसू नकोस.' तोतारामने हे ऐकताच तो तेच वाक्य पुन्हा पुन्हा म्हणू लागला. गंमत म्हणजे हा तोताराम त्याच नळावर बसून म्हणत होता, 'तोताराम, नळावर बसू नकोस, तोताराम, नळावर बसू नकोस... तोताराम...'

आध्यात्मिक अर्थ – भक्ती मार्गात गीतेचे पठण कुणी अर्धा तासात पूर्ण करणारे आहेत, तर कुणी गीतेवर तासंतास भाषण करणारेही आहेत. गीतेचा पहिला अध्याय म्हणजे स्वतःची ओळख. आपण देह नसून आत्मा आहोत. आत्मा अजर, अमर आहे आणि देह नश्वर आहे. सर्व मानव मर्त्य आहेत. शेवटचा अध्याय–नष्टोमोहः स्थितीच्या उंचीवर नेतो. ते साधनेचे उद्दीष्ट आहे.

सांप्रत समयी परमात्मा शिव, सर्व वेदांचे, शास्त्रांचे, ग्रंथांचे सार समजावत आहेत, आध्यात्मिक रहस्य स्पष्ट करत आहेत. ते ज्ञान आपण आपल्या जीवनात सहज आत्मसात करू शकतो.

***

# दिलवाडा मंदिर

हे जैन धर्माचे एक विलक्षण आणि सुंदर असे मंदिर आहे. माउंट आबू येथील दर्शनीय आणि आकर्षक स्थानांपैकी एक आहे. मंदिर परिसरातील सुंदर अशा स्थानांमध्ये तेथील १०८ खोल्याचे स्थान म्हणजे तपस्वी साधकांची आठवण म्हणून प्रख्यात आहे. ह्यात एक–एक राजयोगी तपस्येमध्ये बसलेले दाखवण्यात आले आहे. छतावर मनोरम असे सुंदर स्वर्गीय दृश्य सजविलेले दिसून येते. शिवबाबा आपल्या ब्राह्मण मुलांना ज्ञान आणि राजयोग शिकवत आहेत. जे शिवबाबांच्या कायम आठवणीत राहून पुरुषार्थ करतात, ते स्वर्गात जाण्याचा अधिकार प्राप्त करतात. सर्वसाधारण समजानुसार स्वर्ग कुठेतरी वर आकाशात मानतात. मात्र शिवपिता सांगतात आगामी काळात अशी सृष्टी येऊ पाहत आहे. त्याकरिता साधनेची आवश्यकता आहे.

***



# स्वास्थ्य तुमच्या हातात

## "मल निष्कासनाचा योग्य विधि"

ब्र.कु. डॉ. सज्जला जोशी, आबू रोड

आजच्या ह्या भागात आपण मल–निष्कासन म्हणजेच शौच विधी कसा असावा हे जाणून घेणार आहोत. तुम्हाला वाटत असेल हा विधी एवढा महत्वपूर्ण आहे का! एखाद्याला आपण निरोगी राहावे असे वाटत असल्यास त्या व्यक्तीचा हा विधी योग्य असणे अत्यंत आवश्यक आहे. कारण सकाळी मलत्याग चांगला झाला, तर दिवसही खूप छान जातो, नाहीतर शरीरात काहीतरी जडजड आहे, मळमळ होतेय, भूक लागत नाही, आळस येतोय असे सारखे वाटत राहते. सर्वांनीच ह्याचा कधी ना कधी अनुभव घेतलाच असावा! आयुर्वेदानुसार रात्रौ २ ते सकाळी ६ ही वाताची वेळ आहे हे आपण मागच्याच भागात वाचले. वात शारीरिक हालचाल आतून नियंत्रित करतो. मलाला सकाळची वेळ ह्याचसाठी दिलेली आहे, कारण ह्या वेळांत वात दोषाचे प्राबल्य असते. पण आपण बघतो की काही लोक सकाळी उठतच नाही (म्हणजे सूर्योदयापूर्वी) ते उशिरा ७–८ ला उठतात. मग म्हणतात माझं पोट न आज साफच झालं नाही. जड–जड वाटतंय! अहो पण कसे साफ होणार पोट जर तुम्ही अवेळी शौचास गेलात तर? कारण ती मलनिष्कासनाची वेळ तर निघून गेलेली आहे. म्हणूनच प्रत्येक व्यक्तीने हे मलत्यागाचे धडे घेणे गरजेचे ठरते. (Toilet training) म्हणजेच सकाळी सूर्योदयापूर्वी उठावे. मलत्याग कसा बरे करावा? आयुर्वेद ह्यासाठी म्हणते की मलत्याग करताना उकड बसावे म्हणजेच आपल्या भारतीय पद्धतीचे संडास आहेत, ते ह्या विधिसाठी अत्यंत योग्य पद्धतीचे आहेत! म्हणजे बघा – उकड बसले म्हणजे आपल्या जे पिंड्या (calf muscules) वर एक प्रकारचा ताण येतो, त्यामुळे पोटावर विशिष्ट ताण येऊन योग्य प्रकारे मल विसर्जनाला मदत होते.

आता कुणी म्हणेल, आमच्या घरात तर भारतीय शैलीचे संडास नाहीत. आता ह्यावर उपाय काय? काळजी नको. आपल्या ह्याही प्रश्नाला आमच्याकडे उत्तर आहेत! आपल्याकडे इंग्रजी पद्धतीचे जे Toilet Pot असतील त्यावर बसावे, पायाखाली थोड्या उंचीचे Stool घ्यावे, जेणे करून आपले पाय थोडे वर सरकले जातील. अशाने तो कोन (जो आपल्या भारतीय Pot वर बसून होईल) तो बरोबर तयार होईल आणि आपल्याला हवा तो अपेक्षित परिणाम मिळेल.

ह्यानंतर तुम्ही म्हणाल आम्हाला तर इंग्रजी पद्धतीचे संडास (Pot) वापरण्याची सवय आहे. मग आम्ही काय करावे? Stool वापरणे गरजेचे आहे का हो? तर हो पायाखाली असा Stool घेणे हा मधला मार्ग, ही खूप उपयोगी अशी क्रिया आहे.

कुणी म्हणते मला संडासात अर्धा तास तरी लागतो, ४५ मिनिटे लागतात. पण त्यासाठी किती वेळ लागवा माहित्येय का तुम्हाला? ऐकून चकित व्हाल आपण पण आयुर्वेद म्हणते फक्त २ ते ३ मिनिटांत तुमचा कोठा साफ व्हायला हवा. पण जेव्हा कुणाही रोग्याला आम्ही डॉक्टर विचारतो, तेव्हा ते बराच वेळ असं सांगतात. त्याचं कारण हेच की सूर्योदयापूर्वी मलत्याग न करणे. आपणांस वाटत असेल, माझं शरीर निरोगी, सुदृढ असावे आणि मी दीर्घायुषी व्हावे तर मल निष्कासन हे सूर्योदयापूर्वीच व्हावे. मग त्यासाठी लवकर उठणे ओघानेच आले नाही का?

मल निष्कासन करताना बरीच लोक वेगवेगळ्या सवयी जोपासतात. जसे वर्तमान पत्रे वाचणे, पुस्तक वाचणे किंवा Laptop, मोबाईल बघत राहणे. गाणी ऐकणे इ. पण आयुर्वेदाच्या दृष्टिने एका वेळी एकच क्रिया करणे जास्त योग्य असते. मल त्याग करणे ही एक महत्वाची क्रिया आहे, हे करत असताना दुसऱ्या गोष्टी करत करत त्याच अवस्थेत जास्त काळ बसल्यास

शरीरात असणारा अपानवायू (आयुर्वेदाच्या दृष्टिने वाताचे ५ प्रकार आहेत.) बिघडतो.

त्या प्रकारातील अपानवायू त्या ठिकाणी अडकून पडतो. मग हेच लोक डॉक्टरांकडे तक्रार करतात की मला न पोटातून गुडगुड असा आवाज येतो किंवा पोटात फार वायू फिरतात. माझे मल थोडे थोडे पडते. ह्याचे कारण जे वर सांगितले की त्या स्थितीत जास्त काळ बसणे त्यामुळे पोटातील आतड्यांवर फार ताण येतो. म्हणूनच मल निष्कासन करताना कुठलीही दुसरी क्रिया करणे टाळावे हेच उत्तम.

वेग येताच मल निष्कासन करावे म्हणजे शरीर निरोगी राहण्यास मदत होईल. काही लोकांना सवय असते. आज मला लवकर जायचेय स्वयंपाक करायचाय, हे काम आहे, ते काम झाल्यावर जाऊ असे करून तो वेग थांबवून ठेवतात, जाणे टाळतात पण तुम्हाला सांगते जर मल वेग धारण कराल, तर मलासंबंधित वेगवेगळे आजार बळावतात त्यातीलच एक गंभीर आजार म्हणजे (Piles) अर्श-मूळव्याध. हा आजार व्हायला वरील कारणच कारणीभूत ठरते. त्यात जठराअग्नी हाही दुष्ट (Problematic) झालेला असतो. पण योग्य वेळी मल निष्कासन न केल्याने हा आजार जास्त प्रमाणात होतो.

पुढील भागात स्वस्थ व्यक्तीचे मन कसे असावे, ह्यावर प्रकाश टाकू. तोपर्यंत ओम्-शांती.

***

## शिवावतरण

महाशिवरात्र महान दिवशी शिव अवतरती भूवरी
नवयुगाचे सृजन करण्या ब्रह्माच्या देही
नवयुग निर्माता शिवबाबांनी कार्य दिले ब्रह्माच्या हाती
सांगून, तूच नव्या युगाचा शिल्पकार
बघता बघता वर्ष लोटली पुरे नव्वद
अरावली पर्वतराजीत नवसृष्टी अवतरली
लक्ष्मी - नारायण सम बनण्याचे लक्ष घेतलेले
लाखो ब्रह्मवृंद तप त्यागी झाले
त्या आबू च्या मातीमध्ये वेगळाच गंध
कोळशास हिरे करण्याचा तिचा नित्य छंद

**कवी - ब्र.कु. भरत भालके, शहापूर**




**भिलवडी : महाशिवरात्रीनिमित्त आयोजित कार्यक्रमाचे दीप प्रज्वलनानंतर उद्योजक भ्राता गिरीश चितळे, उद्योजक भ्राता राजेश चौगुले, पोलीस निरीक्षक भ्राता भगवान पालवे, ब्र.कु. निवेदिता, ब्र.कु. मीरा**

## सत्य

तूच एक सत्य हो बाबा
सारी दुनिया खोटी
खोट्या मोह मायेत
दुनिया ही बुडती

दुरावले नातेगोते
तुझी छाया मोठी
खोट्या मोह मायेत
दुनिया ही डूबती

काटेरी या दुनियेत
तूच सखा वाली
तूच एक खरा दाता
दुनिया व्यापारी

हात धरुनी काढले मज
नवी दुनियादारी
तूच एक खरा दाता
तूच सखा वाली

मनाच्या अंधारात ज्योत जागविली
ज्ञानोदयाने मने प्रकाशित झाली
माळरानावर हिरवळ फुलली
तूच खरा दाता तूच सखा, वाली

**ब्र.कु. लता, नांदेड**